१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

रायगड बुधवार । दि. १९ ऑगस्ट २०२६ । अंक ७४ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

### पुण्यात ३१ ऑगस्टपर्यंत जमावबंदी

**पुणे** : आगामी सण आणि अतिक्रमण हटाव कारवाईच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरात मंगळवार, १८ ऑगस्टपासून ३१ ऑगस्टच्या मध्यरात्रीपर्यंत जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे. पुणे पोलिसांच्या विशेष शाखेने याबाबत आदेश जारी केले आहेत. ईद-ए-मिलाद, नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधन या सणांच्या काळात होणारी गर्दी तसेच विविध राजकीय व सामाजिक संघटनांकडून मोर्चे, निदर्शने, धरणे किंवा उपोषण होण्याची शक्यता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

### कामोठ्यात शौचालय बनले 'लॉजिंग'

**पनवेल** : पनवेल महानगरपालिकेने नागरिकांच्या सुविधेसाठी उभारलेले शौचालय सध्या चक्क 'लॉजिंग'मध्ये रूपांतरित झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शौचालयाच्या इमारतीत सोफा, वॉशिंग मशीन, किचनसह इतर सुविधा उभारण्यात आल्याचे दिसून येत असल्याने या संपूर्ण प्रकारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवा नेतृत्व सुनील गोवारी यांनी या प्रकाराची व्हिडीओच्या माध्यमातून पोलखोल केली आहे. नागरिकांच्या करातून कोट्यवधींचा निधी खर्च करून उभारण्यात येणाऱ्या सार्वजनिक सुविधांचा नेमका पान २ वर

## वेधक

### दाभोलकर हत्या; सचिन अंदुरेला जामीन


**मुंबई** : डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणातील दोषी सचिन अंदुरेला मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी जामीन मंजूर केला. तसेच सत्र न्यायालयाने २०२४ मध्ये सुनावलेली जन्मठेपेची शिक्षाही स्थगित केली. न्या. सारंग कोतवाल आणि न्या. रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने अंदुरेचा अंतरिम अर्ज मंजूर केला. अंदुरेने दोषसिद्धीला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. दाभोलकरांची २० ऑगस्ट २०१३ रोजी हत्या केली होती. १० मे २०२४ रोजी सत्र न्यायालयाने सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

### नागपुरात १२ शाळांना बॉम्बस्फोटाची धमकी

**नागपूर** : शहरातील १२ नामांकित खासगी आणि सरकारी शाळांना मंगळवारी सकाळी एकसारखा धमकीचा ई-मेल आल्याने खळबळ उडाली. शाळा बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आल्याने प्रशासन आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. धमकीचा ई-मेल मिळताच पोलिसांनी तातडीने संबंधित शाळांमध्ये बंदोबस्त तैनात केला. बॉम्बशोधक व नाशक पथक आणि श्वान पथकाने शाळा परिसराची कसून तपासणी केली. प्राथमिक तपासणीत कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नसल्याची माहिती आहे.

## अल निनोचा कहर; देशात 13 टक्के पर्जन्यतूट

# मान्सून संकटात




**। मुंबई । प्रतिनिधी ।**

प्रशांत महासागरातील अल निनोची स्थिती दिवसेंदिवस तीव्र होत असल्याने भारताच्या मान्सूनवर संकटाचे ढग गडद झाले आहेत. खासगी हवामान संस्था स्कायमेटने यंदाच्या मान्सूनचा अंदाज तब्बल ९४ टक्क्यांवरून घटवून ८५ टक्क्यांवर आणला असून, देशात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याचा धोका ७० टक्क्यांपर्यंत असल्याचे म्हटले आहे. याचा सर्वाधिक फटका महाराष्ट्राला बसण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दुसरीकडे भारतीय हवामान विभागानेही आपल्या अंदाजात कपात करून पावसाबाबत सावध इशारा दिला आहे. देशात आतापर्यंत सरासरीच्या तुलनेत तब्बल १३ टक्के पर्जन्य तूट नोंदवण्यात आली आहे. पाऊस आणखी कमी झाला तर त्याचा थेट फटका खरीप पिकांना, धरणांतील पाणीसाठ्याला आणि पुढे सर्वसामान्यांच्या ताटातील अन्नधान्याच्या किमतींना बसण्याची शक्यता आहे. पावसाने विश्रांती घेतल्यामुळे बळीराजा चिंताग्रस्त झाला आहे. सप्टेंबर महिन्याची सुरुवात होताच पाऊस आणखी ओढ देण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

एप्रिलमध्ये स्कायमेटने यंदा दीर्घकालीन सरासरीच्या ९४ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला होता. मात्र, अल निनो अधिक मजबूत होत असल्याने आणि हिंद महासागर द्विध्रुवाच्या स्थितीबाबत अनिश्चितता वाढल्याने संस्थेने हा अंदाज आता पान २ वर

#### महाराष्ट्राला फटका बसण्याची शक्यता

महाराष्ट्रातील मोठ्या भागातील शेती पावसावर अवलंबून असल्याने पावसातील खंडाचा सर्वाधिक फटका राज्यातील शेतकऱ्यांना बसू शकतो. भात, कापूस, कडधान्ये, तेलबिया आणि इतर खरीप पिकांसाठी पावसाची योग्य वेळी होणारी हजेरी अत्यंत महत्त्वाची आहे. पिकांच्या वाढीच्या आणि दाणे भरण्याच्या काळात पाऊस कमी पडल्यास उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे.

#### २०१५ची पुनरावृत्ती होणार?

मजबूत अल निनोच्या पार्श्वभूमीवर २०१५च्या मान्सूनची आठवण होत आहे. त्या वर्षी सुरुवातीचा पावसाचा अंदाज नंतर कमी करण्यात आला आणि प्रत्यक्षात देशात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला होता. मात्र, प्रत्येक अल निनोचा परिणाम सारखाच होत नसल्याने २०२६ची परिस्थिती २०१५सारखीच असेल, असे निश्चितपणे म्हणता येणार नाही.

#### धरणांतील पाणीसाठ्यावरही परिणाम

ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पाऊस कमी राहिल्यास धरणे, तलाव आणि जलाशयांमधील पाणीसाठा अपेक्षेइतका वाढणार नाही. याचा परिणाम यंदाच्या खरिपासोबतच आगामी रब्बी हंगामावरही होऊ शकतो. गहू, हरभरा, मोहरी यांसारख्या रब्बी पिकांसाठी हिवाळ्यातील सिंचन महत्त्वाचे असल्याने मान्सूनचा शेवटचा टप्पा निर्णायक ठरणार आहे.

## गव्हाणमध्ये पहाटे सशस्त्र दरोडा

### चाकूचा धाक दाखवून पाच तोळे सोने अन् दोन लाखांची रोकड लंपास

**। उरण । प्रतिनिधी ।**

उलवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गव्हाण गावात पहाटे सशस्त्र दरोडा पडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास चार अनोळखी चोरट्यांनी घरात घुसून चाकूचा धाक दाखवत सुमारे पाच तोळे सोन्याचे दागिने आणि दोन लाख रुपये रोख असा लाखोंचा ऐवज लंपास केला.

गव्हाण गावातील शेवंताबाई धाया कोळी (५३) यांच्या घरात चार अनोळखी चोरटे घुसले. घरातील व्यक्तींना चाकूचा धाक दाखवत धमकावल्यानंतर चोरट्यांनी घरातील सोन्याचे दागिने आणि रोकड घेऊन पोबारा केला.

पहाटेच्या वेळी घरात घुसून शस्त्राचा धाक दाखवत दरोडा पडल्याने गव्हाण परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. चोरट्यांच्या या धाडसी कारवाईमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच उलवा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून, चारही अनोळखी आरोपींचा शोध सुरू केला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती आहे.

दरम्यान, पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढण्याचे काम सुरू आहे. पहाटेच्या वेळी घरात घुसून दरोडा टाकणाऱ्या या टोळीचा पोलिसांनी तातडीने छडा लावून आरोपींना जेरबंद करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## २५ ते ३० कुटुंबे दरडीच्या धोक्यात

### दोन वर्षांनंतरही तिसेतील संरक्षण भिंतीला मुहूर्त मिळेना



**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यात दरडप्रवण घोषित करण्यात आलेल्या तिसे गावातील ग्रामस्थ गेल्या दोन वर्षांपासून भीतीच्या सावटाखाली जीवन जगत आहेत. डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या २५ ते ३० कुटुंबांना दरडीचा धोका असून, पावसाचा जोर वाढला की जीवित आणि घरांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी पाहणी करून संरक्षण भिंत उभारण्याचे पान २ वर

### 'डिजिटल अटके'ची धमकी; लाखोंचा गंडा

**। उरण । प्रतिनिधी ।**

'डिजिटल अटक' आणि 'मनी लॉन्ड्रिंग'च्या नावाने सायबर भामट्यांनी उरणमधील ६८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला तब्बल २९ लाख ३६ हजार ९४ रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. टेलिकॉम कंपनी, सीबीआय आणि पोलीस अधिकारी असल्याचे भासवून आरोपींनी धमकावले. याप्रकरणी उरण पोलीस ठाण्यात अनोळखी आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, १४ जुलै रोजी एका महिलेने फोन करून आपण टेलिकॉम कंपनीतून बोलत असल्याचे सांगितले. मुंबईत त्यांच्या नावाने बनावट पान २ वर



# अदानी दिघी पोर्टविरोधात भूमीपुत्रांचा एल्गार

- मासेमारी हिरावून घेणारा विकास आम्हाला नको!
- जनसुनावणीत प्रशासनावरही संताप व्यक्त

| बोर्ली पंचतन | प्रतिनिधी |

अदानी समूहाच्या दिघी पोर्ट विस्ताराचा मुद्दा आता थेट मच्छीमारांच्या अस्तित्वाशी जोडला गेला आहे. विकासाला विरोध नाही; मात्र आमच्या समुद्रावर, मासेमारीवर आणि उदरनिर्वाहावर गदा आणणारा विकास नको!' असा आक्रमक पवित्रा घेत तेरा गाव महादेव कोळी समाजाने प्रस्तावित विस्ताराला तीव्र विरोध केला. दिघी-आगरदांडा खाडीतील मासेमारी क्षेत्र धोक्यात येण्याची भीती व्यक्त करत शेकडो कोळी बांधवांनी सोमवारी करलास येथील जनसुनावणीत प्रशासनासमोर आपला संताप आणि आक्षेप जोरदारपणे मांडले.

दिघी बंदराची सध्याची माल हाताळणी क्षमता २३.६५ दशलक्ष मेट्रिक टन प्रतिवर्ष आहे. प्रस्तावित विस्तारानंतर ही क्षमता तब्बल १४० दशलक्ष मेट्रिक टन प्रतिवर्ष करण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी मोठ्या प्रमाणावर समुद्रात खोदकाम, भराव, ब्रेकवॉटर, एसपीएम आणि अन्य बंदरविषयक पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. या कामांमुळे राजपुरी खाडीतील पारंपरिक मासेमारीवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता मच्छीमारांनी व्यक्त केली. दिघी, राजपुरी, आगरदांडा, एकदरा, आदगाव, नानवली, तुरुंबाडी, कुडगाव, साळवली, मुरुड परिसरातील पारंपरिक मच्छीमार मोठ्या संख्येने जनसुनावणीला उपस्थित होते. बंदर विस्तारामुळे मासेमारीचे क्षेत्र कमी होईल, माशांची उपलब्धता घटेल आणि हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर परिणाम होईल, असा आक्षेप त्यांनी नोंदविला.






### आधी आश्वासने पूर्ण करा

२००५ पासून दिघी बंदराच्या प्रशासनाकडून आणि नंतर अदानी समूहाकडे बंदर हस्तांतरित झाल्यानंतरही स्थानिकांना देण्यात आलेल्या पाणी, वीज, आरोग्य आणि शिक्षणाच्या मूलभूत आश्वासनांची पूर्ण अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे 'जुनी आश्वासने पूर्ण झाली नाहीत, मग नवा विस्तार कशासाठी?' असा सवालही मच्छिमारांनी उपस्थित केला.

मासेमारी हा केवळ व्यवसाय नाही, तर आमच्या पिढ्यांचा जगण्याचा आधार आहे. समुद्र आणि मासेमारी हिरावून घेऊन आमचा विकास होऊ शकत नाही, अशी संतप्त भूमिका कोळी बांधवांनी मांडली.

भूमीपुत्रांच्या हक्कांसाठी न्यायालयीन लढा देणारे ॲड. परशुराम मेंदाडकर, ॲड. चिंतामणी भणगोजी, ॲड. कमलाकर कांदेकर, रायगड जिल्हा कोळी समाजाचे सचिव प्रवीण तांडेल, सामाजिक कार्यकर्ते संकेत गीते, एजाज हवालदार यांच्यासह विविध कार्यकर्त्यांनी स्थानिकांच्या भावना आणि प्रकल्पाचे संभाव्य परिणाम प्रशासनासमोर मांडले.

'विकासाला विरोध नाही; पण ज्यांच्या समुद्रावर, जमिनीवर आणि उपजीविकेवर विकास उभा राहणार आहे, त्यांनाच भकास करणारा विकास नको,' अशी ठाम भूमिका मच्छिमारांनी घेतली.

प्रस्तावित विस्तार रद्द करण्याची मागणी करत तेरा गाव कोळी समाजाने जनसुनावणीत एकजुटीने विरोध नोंदविला. शांततामय आणि लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवण्याचा इशारा देत 'मच्छीमारांच्या उपजीविकेशी आणि भूमीपुत्रांच्या हक्कांशी तडजोड केली जाणार नाही,' असे स्पष्ट करण्यात आले. उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी स्थानिकांचे आक्षेप आणि मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, जनसुनावणीच्या पार्श्वभूमीवर अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

सोमवारी करलास येथे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या महाड विभागामार्फत सार्वजनिक जनसुनावणी घेण्यात आली. उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी उपस्थित होते. सुनावणी दुपारी दोन वाजता नियोजित असताना प्रशासनाचे अधिकारी सुमारे पाऊण तास उशिराने दाखल झाल्याने वेळेवर आलेल्या नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

## शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे!




- प्रलंबित भूसंपादन आणि मोबदल्याचा प्रश्न ऐरणीवर

| कोर्लई | प्रतिनिधी |

वर्षानुवर्षे जमिनी विकासासाठी घेताय आणि मोबदल्यासाठी शेतकऱ्यांना सरकारी कार्यालयांच्या फेऱ्या मारायला लावताय; मग हा विकास नेमका कुणासाठी? असा सवाल उपस्थित करत सामाजिक कार्यकर्ते नथुराम माळी यांनी दिघी बंदर विस्ताराच्या जनसुनावणीत प्रशासनाला धारेवर धरले. विकासाला विरोध नाही; मात्र विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांवर अन्याय सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

दिघी येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी रायगड संदेश शिर्के, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि संबंधित शासकीय यंत्रणांच्या उपस्थितीत झालेल्या पर्यावरणीय जनसुनावणीत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी विविध हरकती आणि मागण्या मांडल्या. प्रलंबित भूसंपादन आणि मोबदल्याचे प्रश्न आधी निकाली काढा आणि त्यानंतरच नवीन प्रकल्पांची पुढील कार्यवाही करा, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. आगरदांडा-इंदापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ अ साठी जमीन बाधित झालेल्या काही शेतकऱ्यांचे भूसंपादन आणि संबंधित कार्यवाही २०१८ पासून प्रलंबित असल्याचा मुद्दा माळी यांनी उपस्थित केला. आगरदांडा-रोहा अदानी रेल्वे मार्गासाठी २४ एप्रिल २०२३ रोजी भूसंपादनाची अधिसूचना काढण्यात आली. मात्र, त्यानंतर प्रत्यक्ष भूसंपादनाची पुढील कार्यवाही झालेली नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

## मजूर गुंतले गाळ काढण्यात



- पाणी सोडूनही शार्लोटमधील गाळ तसाच!
- ऐन पावसाळ्यात प्रशासनाची उडाली धावपळ

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान शहराची तहान भागविण्यासाठी ब्रिटिशांनी बांधलेल्या शार्लोट लेकच्या देखभालीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गाळ काढण्यासाठी तलावातील पाणी सोडण्यात आले; मात्र अपेक्षित प्रमाणात गाळ वाहून न गेल्याने नगरपरिषदेचा हा प्रयोग फसल्याचे चित्र आहे. त्यानंतर आता नगरपरिषदेला जाग आली असून, ठेकेदारामार्फत मनुष्यबळ वापरून तलावातील गाळ काढण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. गेल्या दोन दिवसांपासून तब्बल ५० ते ६० मजूर गाळ काढण्याच्या कामात गुंतले आहेत.

दरम्यान, ऐन पावसाळ्यात पाणी सोडण्याचा निर्णय नेमका कशासाठी घेण्यात आला? पाणी सोडण्यास परवानगी होती का? आणि विना परवाना पाणी सोडले असल्यास संबंधितांवर कोणती कारवाई होणार? असा संतप्त सवाल माथेरानचे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी उपस्थित केला आहे.

माथेरान नगरपरिषदेच्या मालकीच्या शार्लोट लेकमधील गाळ काढण्याचे काम सध्या सुरू आहे. मात्र, तलावातील पाण्याची मालकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे असल्याचे सांगितले जाते. असे असताना १० ऑगस्ट रोजी तलावातील पाणी सोडण्यात आले. पाण्याच्या प्रवाहाबरोबर गाळ वाहून जाईल, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

मात्र, पाणी सोडल्यानंतरही अपेक्षित प्रमाणात गाळ वाहून गेला नाही. त्यामुळे तलावातील गाळ मोठ्या प्रमाणात कायम राहिला. परिणामी, पाणी सोडण्याचा प्रयोग अपयशी ठरल्यानंतर आता पुन्हा पारंपरिक पद्धतीने मनुष्यबळाच्या सहाय्याने गाळ काढण्याची वेळ नगरपरिषदेवर आली आहे.

# पालीकरांची खासदारांकडून निराशा

### वर्षभरापासून पाणीप्रश्न जैसे थे

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत आढावा बैठकीत पाली शहराचे वर्षानुवर्षे रखडलेले प्रश्न सुटतील या आशेने जमलेल्या नागरिकांची मंगळवारी घोर निराशा झाली. खासदारांच्या अचानक अनुपस्थितीमुळे मंगळवारी (दि. १८) आढावा बैठक आ. अनिकेत तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यामुळे नाराज झालेल्या काही पालीकरांनी केवळ पोकळ आश्वासने नको, तर प्रत्यक्ष ठोस कृती करा, असे लोकप्रतिनिधींना सांगून पाली-सुधागड संघर्ष समिती पदाधिकारी, सदस्य यांनी सभात्याग केला.

या बैठकीत पालीचा अत्यंत जिव्हाळ्याचा पाणीप्रश्न, पाणी फिल्टर योजना, बाह्यवळण रस्ता आणि इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊनही धूळ खात पडलेले उपजिल्हा रुग्णालय या विषयांवर विस्तृत चर्चा झाली. मात्र, मागील वर्षी खा. तटकरे यांनी आठ दिवसांत पाणीप्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, वर्ष उलटूनही स्थिती जैसे थे असल्याने उपस्थितांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. लोकप्रतिनिधींकडून केवळ आढावा बैठकांचा फार्स सुरू असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. यावर सुधागड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष तथा पंचायत समिती उपसभापती संदेश शेवाळे यांनी सांगितले की, दिल्लीत तातडीची आणि महत्त्वाची बैठक असल्याने खासदार सुनील तटकरे यांना अचानक जावे लागले. त्यांच्याच सूचनेनुसार आ. अनिकेत तटकरे आढावा घेण्यासाठी उपस्थित राहिले असून पालीकरांच्या प्रत्येक समस्येवर सकारात्मक चर्चा झाली आहे आणि हे सर्व प्रश्न लवकरच मार्गी लावण्यात येतील.

दुसरीकडे, पाली-सुधागड संघर्ष समिती अध्यक्ष व स्थानिक नागरिक कपिल पाटील यांनी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, पालीचे पाणी, रुग्णालय आणि रस्त्याचे प्रश्न वर्षानुवर्षे फक्त कागदावर आणि बैठकांमध्येच अडकले आहेत. बैठकीला खासदार उपस्थित राहून ठोस निर्णय देतील अशी नागरिकांना अपेक्षा होती, पण पुन्हा एकदा आमची निराशाच झाली. आता आम्हाला आश्वासने नकोत, तर प्रत्यक्ष पाणी आणि आरोग्य सुविधांची कालमर्यादा ठरवून कामाची पूर्तता हवी आहे.

# १४ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांवर फौजदारी खटले

### सर्वोच्च न्यायालयात धक्कादायक माहिती

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

राजकीय नेत्यांविरोधातील फौजदारी खटल्यांची जलदगतीने सुनावणी करण्याच्या मागणीवर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान देशातील राजकीय व्यवस्थेबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. देशातील २८ पैकी १४ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांविरोधात फौजदारी खटले प्रलंबित असल्याची माहिती ॲड. विजय हंसारिया यांनी सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या अहवालातून समोर आली आहे.

या यादीत तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी आघाडीवर असून, त्यांच्याविरोधात तब्बल ८९ फौजदारी खटले दाखल असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदु अधिकारी यांच्याविरोधात २९ खटले आहेत.

कर्नाटकचे मुख्यमंत्री डी.के. शिवकुमार आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांच्याविरोधात प्रत्येकी १९ फौजदारी खटले आहेत. केरळचे मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन यांच्याविरोधात १८ खटले दाखल असल्याची माहिती न्यायालयात देण्यात आली. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याविरोधात पाच, तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुक्खू यांच्याविरोधात प्रत्येकी चार फौजदारी खटले आहेत. तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय आणि बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्याविरोधात प्रत्येकी दोन खटले असल्याचे अहवालात म्हटले आहे.

# गुटखाबंदीचा फायदा ब्लॅकमेलर्सना

### स्वयंघोषित पत्रकारांसह कथित समाजसेवक आघाडीवर?

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

महाराष्ट्रात गुटखा आणि प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी असतानाही पनवेल परिसरात छुप्या पद्धतीने गुटख्याची विक्री सुरू असल्याची चर्चा आहे. ग्राहकांची मागणी आणि जास्त नफा यामुळे काही विक्रेते गुप्तपणे प्रतिबंधित पदार्थांची विक्री करत असल्याचे बोलले जात आहे. मात्र, या बेकायदा व्यवहाराच्या आडून काहीजण विक्रेत्यांना लक्ष्य करून आर्थिक फायदा घेत असल्याचा आरोप होत आहे.

गुटखा विक्री करणाऱ्या काही दुकानदारांवर नजर ठेवून त्यांचे छायाचित्र किंवा व्हिडीओ काढणे, कारवाईची भीती दाखवणे, संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याची धमकी देणे आणि त्यानंतर आर्थिक तडजोडीसाठी दबाव आणणे, असे प्रकार होत असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, स्वयंघोषित पत्रकारांसह काही कथित समाजसेवक या प्रकारात आघाडीवर असल्याचा आरोप केला जात आहे. गुटखा विक्री हा कायद्याने प्रतिबंधित प्रकार असला तरी त्याविरोधात कारवाई करण्याचा अधिकार संबंधित शासकीय यंत्रणांना आहे. त्यामुळे कारवाईच्या नावाखाली कोणत्याही व्यक्तीने स्वतःहून विक्रेत्यांकडून पैसे मागणे किंवा दबाव आणणे हा स्वतंत्रपणे गंभीर विषय ठरू शकतो. अशा प्रकारच्या तक्रारी असल्यास संबंधित व्यक्तींची भूमिका आणि आर्थिक व्यवहार यांचीही चौकशी होणे आवश्यक आहे. दरम्यान, प्रतिबंधित गुटख्याच्या विक्रीविरोधात प्रशासनाकडून वेळोवेळी कारवाई केली जाते. पनवेल आणि परिसरातही प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ जप्त केल्याच्या घटना यापूर्वी समोर आल्या आहेत. त्यामुळे गुटख्याची बेकायदा विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबरोबरच या व्यवसायाच्या नावाखाली कथितरीत्या ब्लॅकमेलिंग करणाऱ्यांवरही लक्ष ठेवण्याची गरज व्यक्त होत आहे.

गुटखाविक्रीकरणारेदोषीअसतील तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे; मात्र कारवाईची भीती दाखवून पैसे उकळणाऱ्यांवरही तितकीच कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. स्वयंघोषित पत्रकार किंवा कथित समाजसेवकांच्या नावाचा गैरवापर करून अशा प्रकारे आर्थिक तडजोडी होत असतील, तर संबंधित यंत्रणांनी या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी होत आहे.

## पान १ वरून

### कामोठ्यात शौचालय बनले 'लॉजिंग'

वापर कशासाठी होत आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

'शौचालयाच्या नावाखाली कंत्राट, सुविधा मात्र लॉजिंगच्या!' असा आरोप करत गोवारी यांनी पनवेल महानगरपालिकेच्या अधिकारी आणि संबंधित कंत्राटदारांच्या भूमिकेवर थेट निशाणा साधला आहे. सार्वजनिक निधीचा अशा पद्धतीने वापर होत असेल तर त्याची चौकशी होणे गरजेचे असल्याची मागणीही त्यांनी केली. विशेष म्हणजे, शौचालयाच्या ठिकाणी सोफा, वॉशिंग मशीन आणि किचनसारख्या सुविधा कशासाठी उभारण्यात आल्या? या कामासाठी कोणत्या निधीतून किती खर्च झाला? कामाचे अंदाजपत्रक काय होते? प्रत्यक्षात मंजूर आराखड्यानुसारच बांधकाम झाले का? याची महानगरपालिकेने तातडीने चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी होत आहे.

गोवारी यांनी या प्रकारावर बोचरी टीका करताना, एवढेच करायचे असेल तर या आलिशान शौचालयावर आणखी चार मजले बांधा आणि तेही लॉजिंगमध्ये रूपांतरित करा, असा टोला पनवेल महानगरपालिकेला लगावला. दरम्यान, सार्वजनिक शौचालयाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर आणि कंत्राटदारावर कारवाई होणार का, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित होत आहे. महापालिका प्रशासन या 'शौचालय लॉजिंग' प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करणार की या प्रकाराकडेही नेहमीप्रमाणे दुर्लक्ष करणार? याकडे आता पनवेलकरांचे लक्ष लागले आहे.

### मान्सून संकटात

८५ टक्क्यांवर आणला आहे. स्कायमेटच्या निकषानुसार दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस दुष्काळाच्या श्रेणीत येतो. स्कायमेटच्या मते, ऑगस्टमध्ये पाऊस सरासरीच्या सुमारे ८४ टक्के, तर सप्टेंबरमध्ये सुमारे ८० टक्के राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे मान्सूनच्या शेवटच्या टप्प्यात पावसाने दडी मारल्यास परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते.

स्कायमेटचे व्यवस्थापकीय संचालक जतीन सिंग यांच्या मते, अल निनोचा प्रभाव अधिक तीव्र होत असून सप्टेंबरच्या सुरुवातीला त्याची स्थिती 'तीव्र' श्रेणीतून 'अति तीव्र' होण्याची शक्यता आहे. मजबूत अल निनोचा भारतातील कमजोर मान्सूनशी अनेकदा संबंध राहिला आहे. त्यामुळे यंदा पावसाचे वितरण आणि त्याचे प्रमाण या दोन्हींबाबत चिंता वाढली आहे.

भारतीय हवामान विभागानेही यंदाच्या मान्सूनच्या अंदाजात कपात केली आहे. एप्रिलमध्ये आयएमडीने दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा अंदाज दिला होता. त्यानंतर हा अंदाज ९० टक्क्यांवर आणण्यात आला. आयएमडीच्या अंदाजानुसार ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या ९४ टक्क्यांपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.

देशाच्या वार्षिक पावसापैकी सुमारे ७५ ते ८० टक्के पाऊस चार महिन्यांच्या नैऋत्य मान्सूनमधून मिळतो. त्यामुळे मान्सूनच्या अखेरच्या दोन महिन्यांतील पाऊस शेती आणि जलसाठ्यांसाठी निर्णायक ठरणार आहे.

शेतकऱ्यांपासून थेट सर्वसामान्यांच्या ताटापर्यंत परिणाम

पाऊस कमी झाला आणि पिकांचे उत्पादन घटले तर त्याचा परिणाम केवळ शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होणार नाही. डाळी, खाद्यतेले, भाज्या आणि इतर अन्नपदार्थांच्या किमती वाढण्याची शक्यता असल्याने महागाईचा थेट फटका सर्वसामान्यांच्या घरखर्चाला बसू शकतो. जुलैमध्ये किरकोळ महागाईचा दर ४.४५ टक्क्यांवर पोहोचला होता. पावसाची कमतरता कायम राहिल्यास अन्नधान्यांच्या किमतींवर आणखी दबाव येण्याची शक्यता आहे.

सप्टेंबरच्या पावसाकडे लक्ष

आता सर्वांचे लक्ष ऑगस्ट आणि सप्टेंबरच्या पावसाकडे लागले आहे. या काळात दमदार पाऊस झाला तर परिस्थिती काही प्रमाणात सावरू शकते; मात्र पावसाने पुन्हा दडी मारल्यास शेतकरी, पाणीसाठे आणि सर्वसामान्यांच्या ताटावर त्याचे परिणाम स्पष्टपणे जाणवण्याची शक्यता आहे.

### २५ ते ३० कुटुंबे दरडीच्या धोक्यात

आश्वासन दिले; मात्र दोन वर्षांनंतरही प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही.

गतवर्षी मुसळधार पावसात तिसे येथे दरड कोसळल्यानंतर जिल्हाधिकारी किशन जावळे, आमदार अनिकेत तटकरे, तहसीलदार किशोर देशमुख, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांच्यासह प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली होती. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पथकानेही धोकादायक भागाची पाहणी केली होती. त्यावेळी संरक्षण भिंत उभारण्याचे आश्वासन ग्रामस्थांना देण्यात आले.

मात्र, अद्याप काम सुरू न झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे. 'दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा दुर्घटना होण्याआधीच संरक्षण भिंत उभारावी,' अशी मागणी ग्रामस्थ उमेश पांडुरंग शिगवण यांनी केली. उमाजी गणपत गोरीवले, सुनील पांडुरंग शिगवण यांच्यासह अनेक कुटुंबांची घरे धोकादायक परिसरात आहेत.

प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी सांगितले की, संरक्षण भिंतीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्ह्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून काम सुरू केले जाईल.

पाहणी झाली, प्रस्ताव गेला, आश्वासनही मिळाले; आता प्रत्यक्ष काम कधी सुरू होणार? असा सवाल तिसे ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. पावसाळ्यातील धोका लक्षात घेता प्रस्तावाला तातडीने मंजुरी देऊन संरक्षण भिंतीचे काम सुरू करावे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

### 'डिजिटल अटके'ची धमकी; लाखोंचा गंडा

सिमकार्ड वापरले जात असल्याचे सांगून त्यांना घाबरवण्यात आले. त्यानंतर वेगवेगळ्या क्रमांकांवरून आरोपींनी संपर्क साधला. एकाने स्वतःला तपास अधिकारी, दुसऱ्याने सीबीआय अधिकारी तर तिसऱ्याने पोलीस अधिकारी असल्याचे सांगितले.

'मनी लॉन्ड्रिंग, अमली पदार्थांची तस्करी आणि मानवी तस्करीच्या प्रकरणात तुमचे नाव आहे. तुमच्या नावाने बँकेत ७८ लाख रुपये जमा झाले आहेत,' अशी भीती दाखवत अटकेची धमकी देण्यात आली. या दबावाला बळी पडून ज्येष्ठ नागरिकाने १४ जुलै ते १२ ऑगस्टदरम्यान आरोपींनी सांगितलेल्या विविध बँक खात्यांमध्ये तब्बल २९ लाख ३६ हजार ९४ रुपये जमा केले.

फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी १७ ऑगस्ट रोजी उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक राहुल काटवाणी करीत आहेत.

सीबीआय, पोलीस किंवा अन्य कोणतीही सरकारी यंत्रणा फोनवरून पैसे मागत नाही अथवा 'डिजिटल अटक' करीत नाही. अशा प्रकारचा संशयास्पद फोन आल्यास घाबरून न जाता तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा, तसेच १९३० या सायबर हेल्पलाइनवर तक्रार नोंदवावी, असे आवाहन उरण पोलिसांनी केले आहे.

# भूमीपुत्रांचा तहसील कार्यालयावर मोर्चा

### २४ ऑगस्टपासून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग रोखण्याचा इशारा




> "आमच्या हक्काच्या जमिनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कोणताही मोबदला न देता ताब्यात घेतल्या. शासन दरबारी लढा देऊनही न्याय मिळाला नाही, तर २४ ऑगस्ट रोजी दस्तुरी नाका येथे रास्ता रोको करण्यात येईल. आजच्या आंदोलनासाठी आम्ही स्टेज उभारण्याची परवानगी मागितली होती; मात्र तहसील कार्यालयाकडून ती नाकारण्यात आली."
>
> \- जयराम शीद, सामाजिक कार्यकर्ते

| खोपोली | प्रतिनिधी |

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या उभारणीसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने १९९५ मध्ये दस्तुरी (खोपोली) येथील नऊ कुटुंबांची सुमारे सहा हेक्टर जमीन संपादित केली. मात्र, जमीन संपादन होऊन तीन दशके उलटूनही संबंधित कुटुंबांना त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळालेला नसल्याचा आरोप करत मंगळवारी वरदायिनी सेवाभावी सामाजिक संघटनेच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

भूमीहीन झालेल्या कुटुंबांनी मोबदल्यासाठी शासन दरबारी वारंवार पाठपुरावा करूनही दखल घेतली जात नसल्याचा आरोप मोर्चेकऱ्यांनी केला. मोबदल्याचा प्रश्न तातडीने मार्गी न लागल्यास २४ ऑगस्टपासून तीव्र आंदोलन करून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग रोखण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

मोर्चेकऱ्यांशी प्रांताधिकारी प्रकाश सकपाळ यांनी बैठक घेतली. या बैठकीस महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी अभिजीत मुदगल, वनविभागाचे नथुराम कोकरे तसेच खालापूर तालुका भूमिअभिलेख विभागाचे समाधान पाटील उपस्थित होते. मात्र, बैठकीत ठोस निर्णय न झाल्याने मोर्चेकऱ्यांचे समाधान झाले नाही. दरम्यान, बाधित जागेची जिल्हा वनविभाग आणि जिल्हा भूमिअभिलेख अधिकाऱ्यांमार्फत मोजणी करून पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन प्रांताधिकारी सकपाळ यांनी दिले.

# जेएनपीएच्या जागेवर बेकायदा धंद्यांचा सुळसुळाट

| उरण | प्रतिनिधी |

देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या जेएनपीए परिसरात अवैध धंद्यांनी डोके वर काढल्याचा आरोप होत असून, खानावळींच्या आडून गुटखा, गांजा, चरस तसेच गावठी, देशी आणि विदेशी दारूचा व्यवसाय सुरू असल्याची गंभीर तक्रार स्थानिकांकडून करण्यात येत आहे. ऋढख पार्किंगजवळील हॉकर झोन, टँकफार्म परिसर, हॉकर झोन तसेच आऊट गेट परिसरात हे प्रकार सुरू असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे खाणावळ, गॅरेज, टायर-पंक्चर शॉप, पानटपऱ्या आणि अनधिकृत पार्किंगसारखे व्यवसाय जेएनपीएच्या जागेवरच बेकायदेशीरपणे सुरू असल्यास त्यांच्यावर कारवाई कोण करणार? असा थेट सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

जेएनपीएच्या मालकीच्या जागेवर अनधिकृत व्यवसाय उभे राहात असतील, तर संबंधितांना जागा मिळते कशी आणि वर्षानुवर्षे हे प्रकार प्रशासनाच्या नजरेतून सुटतात कसे, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. खाणावळ सुरू असल्याचे दाखवून त्याच्या आडून नशेच्या पदार्थांची कथित विक्री होत असल्याचा आरोप होत असल्याने परिसरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. जेवणाच्या ताटाच्या आड नशेचा माल विकला जात असेल, तर हा प्रकार नेमका कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे? अशी संतप्त विचारणा नागरिकांकडून केली जात आहे. जेएनपीए परिसरातील ऋढख पार्किंगजवळील हॉकर झोन, टँकफार्मजवळील परिसर, हॉकर झोन आणि आऊट गेट परिसरात गुटखा, गांजा, चरस तसेच गावठी, देशी व विदेशी दारूची खुलेआम विक्री होत असल्याचा आरोप आहे. या आरोपांची सत्यता तपासण्यासाठी प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## निवडक

### दिलीप पाटील यांचे निधन

**अलिबाग :** तालुक्यातील वरसोली येथील दिलीप पाटील यांचे बुधवारी (दि.१२) निधन झाले. निधनासमयी ते ६६ वर्षांचे होते. दिलीप पाटील हे मितभाषी, मनमिळाऊ आणि प्रेमळ स्वभावाचे आणि सर्वांच्या सुख-दुःखात सक्रिय सहभाग घेणारे व्यक्तिमत्त्व होते. तसेच, ते सेवानिवृत्त कर्मचारी होते. त्यांच्या निधनाची बातमी समजताच वरसोली परिसरासह पंचक्रोशीतून हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी (दि.१३) वरसोली येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ, मित्रपरिवार व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी दीपाली पाटील, दोन मुले नितीश व मयूर पाटील, सुना, नातवंडे तसेच इतर कुटुंबीय असा मोठा परिवार आहे. दिलीप पाटील यांच्या दशक्रिया विधी (दहावे) शुक्रवारी (दि.२१) सकाळी ८.०० वाजता वरसोली येथील स्मशानभूमीत होणार असल्याची माहिती पाटील कुटुंबीयांकडून देण्यात आली आहे.





### पथविक्रेता समितीचे आरक्षण जाहीर

**आगरदांडा :** मुरूड-जंजिरा नगरपरिषदेच्या नगर पथविक्रेता समिती निवडणूक २०२६ ची महिला आरक्षण सोडत पार पडली. ही सोडत नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी राखी गावडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. मुरुड-जंजिरा नगरपरिषद हद्दीमधील नोंदणीकृत पथविक्रेत्यांमधून ८ जणांच्या नगर पथविक्रेता समितीची निवडणूक जाहीर झाली आहे.
या समितीमधून तीन जागा महिलांसाठी राखीव असून, त्याकरिता सोडत जाहीर करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी राखी गावडे यांनी अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्याक व विकलांग/दिव्यांग या नावाच्या पाच चिठ्ठ्या बनविण्यात आल्या होत्या. त्यातील पहिली चिठ्ठी इतर मागासवर्ग महिला, तर दुसरी चिठ्ठी अल्पसंख्याक महिला या नावाची उचली गेली. त्यामुळे आता सर्वसाधारण ३, अनुसुचित जाती १, अनुसुचित जमाती १, इतर मागासवर्ग १, अल्पसंख्याक १ आणि विकलांग/दिव्यांग १ असे आरक्षण जाहीर करण्यात आले. यावेळी अनिकेत जगदाळे, संजय बामुगडे, प्रकाश आरेकर, सुदेश माळी, सतिष जंजिरकर, आशितोष पाटील, अरविंद गायकर, देवेन सतविडकर आदिंसह मान्यवर उपस्थित होते.




### 'ॲनिमिया मुक्त भारत' अभियानाला सुरुवात

**अलिबाग :** विद्यार्थ्यांमधील ॲनिमिया अर्थात रक्तक्षयाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने अकॉन वेल्फेअर फांऊडेशन यांच्या पुढाकाराने ''ॲनिमिया मुक्त भारत'' अभियानाला अलिबाग तालुक्यात सुरुवात झाली आहे. या अभियानांतर्गत अलिबाग तालुक्यातील सर्व शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामध्ये विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी, ॲनिमियाची प्राथमिक तपासणी, आरोग्य व पोषणाबाबत जनजागृती तसेच आवश्यकतेनुसार औषधोपचार व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवून ॲनिमियाची लवकर ओळख आणि योग्य वेळी आवश्यक उपचार मिळावेत, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. या उपक्रमासाठी अकॉन वेल्फेअर फांऊडेशन, शाळा प्रशासन, शिक्षक, आरोग्य पथक आणि संबंधित संस्थांच्या समन्वयातून काम केले जाणार आहे. निरोगी विद्यार्थी म्हणजे सशक्त भारत या विचाराने सुरू झालेल्या या अभियानातून अलिबाग तालुक्यातील मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

---

#### रखडलेला मुंबई-गोवा महामार्ग

# जिल्ह्याच्या विकासासाठी मोठी अडचण

**सलीम शेख**
**| माणगाव |**

गेली १७ वर्षे रखडलेला आणि सातत्याने चर्चेत असलेला मुंबई-गोवा महामार्ग सध्या रायगड जिल्ह्याच्या आर्थिक विकासासाठी मोठी अडचण ठरत आहे. महामार्गावरील खड्डे, वाहतूक कोंडी, अतिवृष्टी, महापूर आणि घाटमाथ्यावर वारंवार कोसळणाऱ्या दरडी यामुळे माणगावसह महाड, रोहा परिसरातील उद्योग, कारखानदारी, व्यापार आणि पर्यटन व्यवसायावर गंभीर परिणाम होत आहे.

### नवीन उद्योगांना अडथळा

**जिल्ह्यात औद्योगिक विकासासाठी मोठ्या संधी उपलब्ध असतानाही पायाभूत सुविधांची कमकुवत स्थिती हा मोठा अडथळा ठरत आहे. उद्योग सुरू करण्यासाठी वीज, पाणी, जमीन याबरोबरच सक्षम आणि सुरक्षित वाहतूक व्यवस्था अत्यावश्यक असते. महामार्गाची स्थिती अशीच राहिली तर नवीन उद्योगांनी रायगडला पसंती का द्यावी, असा प्रश्न स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. परिणामी रोजगार निर्मितीवरही त्याचा प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.**

### कायमस्वरूपी उपाय कधी?

**गणेशोत्सवाच्या काळात कोकणात मोठ्या प्रमाणात चाकरमानी दाखल होत असतात. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी या काळात अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घातली जाते. मात्र, हा तात्पुरता उपाय असून, महामार्गाची कायमस्वरूपी सुधारणा हाच यावरील प्रभावी मार्ग आहे. त्यामुळे महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करणे, खड्ड्यांची शास्त्रोक्त पद्धतीने दुरुस्ती करणे, घाटभागात दरड प्रतिबंधक उपाययोजना करणे, पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा करणे आणि वाहतूक व्यवस्थेचे प्रभावी नियोजन करणे गरजेचे आहे.**

माणगावसह महाड आणि रोहा परिसरात अनेक छोटे-मोठे उद्योग व कारखाने कार्यरत आहेत. या उद्योगांचे दळणवळण मोठ्या प्रमाणात महामार्गावर अवलंबून आहे. मात्र, मुंबई-गोवा महामार्गाची दयनीय अवस्था, जागोजागी पडलेले मोठमोठे खड्डे आणि वाहतूक कोंडी यामुळे मालवाहतूक वेळेत होत नाही. वाहतूक विलंबामुळे उत्पादन खर्च वाढत असून, उद्योगांच्या कार्यक्षमतेवरही त्याचा परिणाम होत आहे. कच्चा माल वेळेत उपलब्ध न होणे, तयार माल बाजारपेठेत पोहोचण्यास विलंब होणे आणि वाहनांच्या देखभाल-दुरुस्तीचा वाढता खर्च यामुळे उद्योगांसमोर आर्थिक आव्हान निर्माण झाले आहे. महामार्गाची हीच परिस्थिती कायम राहिल्यास रायगडातील विद्यमान उद्योग टिकवणे आणि नव्या उद्योगांना आकर्षित करणे अधिक कठीण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

पावसाळ्यात जिल्ह्यातील घाटमार्गांची परिस्थिती अधिक गंभीर बनते. ताम्हिणी घाटात अतिवृष्टी झाल्यानंतर अनेक ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. काही ठिकाणी पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे रस्त्यांचे नुकसान झाले आहे. दरडी कोसळण्याची भीती आणि अचानक रस्ते बंद होण्याची शक्यता यामुळे वाहनचालकांमध्येही असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. आंबेनळी घाट आणि बोरघाटातही पावसाळ्यात वाहतुकीवर परिणाम झाल्याने मुंबई, पुणे आणि कोकणातील दळणवळणावर त्याचा थेट परिणाम होत आहे.




- **महामार्गावरील खड्ड्यांचे उद्योगांवर विघ्न**
- **पर्यटन व्यवसायालाही मोठा फटका**

तसेच, रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा जिल्हा आहे. येथील समुद्रकिनारे, किल्ले, घाट, धबधबे, निसर्गरम्य ठिकाणे आणि धार्मिक स्थळे पाहण्यासाठी राज्याच्या विविध भागांतून पर्यटक येत असतात. मात्र अतिवृष्टी, खड्डे, दरडी आणि रस्ते बंद होण्याच्या घटनांमुळे पर्यटकांच्या प्रवासाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांच्या उत्पन्नावर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्ग हा केवळ रस्ता नसून, रायगडच्या उद्योग, व्यापार, पर्यटन आणि रोजगाराचा कणा आहे. हा कणा मजबूत झाला तरच रायगडचा औद्योगिक आणि आर्थिक विकास वेगाने होऊ शकतो. त्यामुळे महामार्गाच्या कामाला आता केवळ आश्वासनांची नव्हे, तर ठोस आणि कालबद्ध कृतीची गरज असल्याचे रायगडकरांमधून बोलले जात आहे.

---

## श्रीवर्धनकरांच्या घशाला कोरड



**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहरासह रानवली, गालसुरे, बापवन आणि निगडी या खेडेगावांची तहान भागवणाऱ्या रानवली धरणाची यावर्षी चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाच्या अनियमिततेमुळे धरणातील पाणी साठ्यात प्रचंड घट झाली असून, श्रीवर्धनकरांवर पाणी टंचाईचे संकट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

रानवली धरणाची पूर्ण संचय पातळी १२१.०० मीटर इतकी आहे. मात्र, सध्या धरणाची पाणी पातळी जेमतेम ११६.०० मीटरवर येऊन ठेपली आहे. पावसाची अनियमितता लक्षात घेता यावर्षी धरण पूर्ण क्षमतेने भरणे अत्यंत कठीण दिसत आहे. सन १९७७मध्ये पूर्णत्वास आलेल्या या धरणामुळे गेल्या अनेक दशकांत श्रीवर्धन शहराला कधीही भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागला नव्हता. परंतु, यंदा धरण पूर्ण न भरल्यास 'धरण उशाला अन् कोरड घशाला' अशी बिकट अवस्था निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रानवली धरणाला

- **रानवली धरणाची चिंताजनक परिस्थिती**
- **पावसाच्या अनियमिततेमुळे पाणी साठ्यात घट**

कोणताही नैसर्गिक जिवंत पाण्याचा स्त्रोत नाही. केवळ पावसाळ्यातील चार महिन्यांत सभोवतालच्या डोंगर उतारावरून वाहून येणारे पाणी हाच या धरणातील साठ्याचा मुख्य आधार आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून धरणालगतच्या डोंगरांवर सुरू असलेल्या बेसुमार उत्खननामुळे पाण्याचे नैसर्गिक मार्ग बदलले आहेत. डोंगरावरून येणारे पावसाचे पाणी धरणाच्या दिशेने न येता इतरत्र वाहून जात आहे. या मानवनिर्मित हस्तक्षेपामुळे धरणात पाण्याची आवक कमालीची घटली आहे. पर्यावरणाचा ऱ्हास आणि पावसाची ओढ यामुळे यंदा पाणी टंचाईचे सावट गहिरे झाले असून प्रशासनाने योग्य नियोजन व उपाययोजना न केल्यास नागरिकांना भीषण समस्येला सामोरे जावे लागेल.

---

## बलात्कारप्रकरणी सश्रम कारावास

**| पाली/वाघोशी | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यातील पोटलज (खुर्द) येथील मतीमंद महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी सदानंद काशिनाथ कदम (६३) यांना दोषी ठरवण्यात आले आहे. याबाबतची सुनावणी सोमवारी (दि.१७) माणगाव येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात पार पडली. या सुनावणीत सदानंद कदम यांना १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा तसेच पीडितेला १ लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. तसेच, दंडाची रक्कम न भरल्यास प्रत्येक कलमानुसार ३ महिने साधा कारावास भोगावा लागणार आहे.

---

## लेखक प्रल्हाद जाधव यांचे अभिवाचन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

पीएनपी कलाविकास मंडळ अंतर्गत ग्रामीण रंगभूमी आयोजित आणि चित्रलेखाताई पाटील पुरस्कृत ''अभिवाचन कट्टा'' या कार्यक्रमाचे आयोजन रविवारी (दि.१६) अलिबाग येथील पीएनपी मध्यवर्ती कार्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. यावेळी प्रख्यात लेखक प्रल्हाद जाधव यांनी अभिवाचन केले. त्यांनी स्वलिखीत ''एका दुर्मिळ माशाचा जीव वाचवण्यासाठी संघर्ष करणाऱ्या एका शाळकरी मुलाच्या चित्रपट कथेचे'' अभिवाचन केले. तसेच, नवोदित लेखकांना प्रल्हाद जाधव यांनी लेखना बाबत मार्गदर्शन केले. यावेळी ज्येष्ठ रंगकर्मी किशोर म्हात्रे, सुनील ठोंबरे, डॉ. वाझे, संतोष बोंद्रे, गुणवंत पाटील, निशिकांत कोळसे, मिलिंद घाडगे, गबाजी गिते, कैलास पिंगळे, विजय म्हात्रे, प्रमोद पाटील, जितेंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान, पीएनपी कलाविकास मंडळाचे उपाध्यक्ष विक्रांत वार्डे यांनी प्रास्ताविक केले. ग्रामीण रंगभूमीचे अध्यक्ष राजन पांचाळ यांनी उपस्थितिथांचे आभार मानले. तर, उपाध्यक्ष देवेंद्र केळूसकर यांनी या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. या संपुर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन ग्रामीण रंगभूमीचे सचिव प्रतिक पानकर यांने केले.



---

## सुधागडातील अभिषेक ठकोरे याचा छंदातून व्यवसाय

**| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |**

छोट्याशा गावातून मोठे स्वप्न पाहून ते पूर्ण करता येते. याचे उदाहरण म्हणजे सुधागड तालुक्यातील नांदगाव येथील अभिषेक ठकोरे. लहानपणी गाड्या बनवण्याच्या छंदातून आज अभिषेकने देशातील २२ राज्यात आपल्या हाताने बनवलेल्या वेगवेगळ्या गाड्यांची विक्री करून नाव कमावले आहे.





अभिषेकचे वडील संजीव ठकोरे हे मिनिडोर चालक आहेत, तर आई सोनल ठकोरे शिक्षिका आहेत. वडिलांसोबत लहानपणापासून मिनिडोर पाहिल्याने त्याला या वाहनाचे विशेष आकर्षण निर्माण झाले. शाळा सुटल्यानंतर आई-वडिलांना न सांगता कचऱ्यातील पुठे, बाटल्यांच्या झाकणांपासून तो स्केल मॉडेल खेळणी बनवायचा. बाजारात मिनिडोरचे स्केल मॉडेल मिळत नसल्याने त्याने स्वतःच ते बनवायला सुरुवात केली. आज त्याच्याकडे मिनिडोरचे वेगवेगळ्या प्रकारचे असंख्य फोटो आहेत. ''पुढील १-२ वर्षात ही वाहने गावातून नाहीशी होतील म्हणून मी वडिलांची मिनिडोर जपून ठेवली आहे'' असे अभिषेक सांगतो. सुरुवातीला खेळ म्हणून सुरू केलेला हा छंद आज व्यवसाय बनला आहे. हूबेहूब तयार केलेली गाड्यांची मॉडेल्स आज देशभरात विकली जात आहेत. अभिषेकच्या या यशावर आईनेही सोशल मीडियावर पोस्ट करत अभिमान व्यक्त केला आहे.

---

## घरफोडी करणारा आरोपी ताब्यात

**| रसायनी | प्रतिनिधी |**

रसायनी येथील डिंपल वाईन शॉपचे शटर तोडून मोबाईल व रोख रक्कम चोरी करणाऱ्या सराईत आरोपीला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने शिताफीने ताब्यात घेतले आहे. याबाबत दि.६ ऑगस्ट रोजी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. कल्याण (प.) येथील रहिवाशी रामनिवास मंजु गुप्ता (३८) असे आरोपीचे नाव असून, त्याने रात्रीच्या वेळी शॉपचे शटर तोडून सॅमसंग कंपनीचा एक मोबाईल आणि ५५ हजार रुपये रोख असा मुद्देमाल चोरी करून नेला होता.

---

## कळंबोलीत जीर्ण झाड कोसळले



**| कळंबोली | प्रतिनिधी |**

कळंबोली सेक्टर-४ येथील बिल्डिंग क्रमांक ४ वर जीर्ण झालेले झाड अचानक कोसळल्याची घटना सोमवारी (दि.१७) दुपारी घडली. झाड कोसळल्याने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच महापालिकेचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि कोसळलेले झाड हटविण्याचे काम सुरू केले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मोठी मालमत्तेची हानी झाली नाही. दरम्यान, परिसरातील जीर्ण व धोकादायक झाडांची पाहणी करून महापालिकेने अशा धोकादायक झाडांचे सर्वेक्षण करून वेळीच छाटणी किंवा आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

## दुर्लक्षामुळे माथेरानचा विकास मेटाकुटीला

**| माथेरान | प्रतिनिधी |**

माथेरान हे मुंबई-पुण्यापासून अगदी जवळचे ठिकाण असून, कुटुंबियांसह निवास करण्यास स्वस्त असल्यामुळे याठिकाणी विशेषतः पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर वर्षासहलीसाठी पर्यटकांची गर्दी असते. त्यातच एकदिवसीय पर्यटकांची संख्या ९० टक्के असून, निवासी पर्यटक सुद्धा नियमितपणे येत आहेत. परंतु, या ठिकणी खासगी वाहनाने येणाऱ्या पर्यटकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यांना नेरळ-माथेरान या घाट रस्त्यात तासंतास अडकून राहावे लागत आहे. त्यातच दस्तुरी नाक्यावर संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांचे वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मनुष्यबळ नसल्याने पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्याचा परिणाम येथील व्यवसायांवर आणि विकासावर होत आहे. पर्यावरण मंत्र्यांच्या दुर्लक्षामुळेच माथेरानचा विकास मेटाकुटीला आल्याचे बोलले जात आहे. माथेरानमध्ये दरवर्षी सुट्ट्यांच्या हंगामात उन्हाळ्यात आणि खासकरून पावसाळ्यात एकदिवसीय पर्यटकांची मोठी गर्दी असते. परंतु, त्यांना येथील वाहतूक कोंडीमुळे माथेरान नकोसे वाटू लागले आहे. १५ ऑगस्ट रोजी तर नेरळपासून पायी चालत येणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षणीय होती. माथेरानमध्ये पंधरा हजार पर्यटक जरी आले तरी माथेरान हाऊसफुल्ल होऊन जाते. यावेळी तर जवळपास पन्नास हजार पेक्षाही अधिक पर्यटक दाखल झाले होते. पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर पर्यटक दाखल झाल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, प्रशासन आणि राजकीय पक्षांच्या नाकर्तेपणामुळे याठिकाणी अद्यापही पर्यायी व्यवस्था उपलब्ध होऊ शकलेली नाही ही खेदाची बाब असून, पर्यटन मंत्र्यांच्या दुर्लक्षामुळे इथला विकास खुंटला आहे. राज्यातील मंत्र्यांना माथेरान हे पर्यटनस्थळ माहीत आहे की नाही, असाही प्रश्न यानिमित्ताने माथेरानकरांमधून उपस्थित केला जात आहे.



---

**एकूण ३० श्रमिकांच्या हाती रिक्षा | उर्वरित श्रमिकांमधून नाराजी व्यक्त**

## नगरपरिषदेच्या पाच ई-रिक्षा सेवेत

**| नेरळ | प्रतिनिधी |**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने माथेरान शहरात पर्यावरणपूरक ई-रिक्षा चालवल्या जात आहेत. या रिक्षा श्रमिकांच्या हाती देण्यात आल्या असून, त्यांची संख्या साध्या २० एवढी आहे. मात्र, नगरपरिषदेच्या मालकीच्या सात पैकी पाच ई-रिक्षा या देखील श्रमिकांच्या हाती देण्यात आल्याने सध्या माथेरानकरांच्या आणि पर्यटकांच्या सेवेत २५ ई-रिक्षा आहेत. मात्र, उर्वरित हातरिक्षा ओढणाऱ्या श्रमिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.



सर्वोच्च न्यायालयात १२ वर्षे कायदेशीर लढाई लढल्यानंतर पर्यावरणपूरक ई-रिक्षांना मंजुरी देण्यात आली. २०२३ मध्ये माथेरान नगरपरिषदेने सात ई-रिक्षा पायलट प्रकल्प म्हणून राबविण्यासाठी खरेदी केल्या होत्या. कालांतराने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर २०२४ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून लॉटरी पद्धतीने सोडत काढून २० ई-रिक्षा हात रिक्षाचालकांना खरेदी करण्याची परवानगी दिली. त्या नंतर आतापर्यंत माथेरानमध्ये २० ई-रिक्षा प्रवासी सेवा देत आहेत. दरम्यान, शासनाने हातरिक्षा ओढणाऱ्या श्रमिकांना नगरपरिषदेच्या ताब्यातील ई-रिक्षा देण्याचा निर्णय घेतला. माथेरान नगरपरिषदेच्या मालकीच्या सात पैकी पाच ई-रिक्षा सुस्थितीत असून, दोन ई-रिक्षा दुरुस्तीच्या कामासाठी पनवेल येथे पाठवण्यात आलेल्या आहेत.

प्राप्त असलेल्या अहवालानुसार माथेरान नगरपरिषदेच्या मालकीच्या पाच ई-रिक्षा १० श्रमिकांना चालवण्यासाठी दिल्या आहेत. या पाच ई-रिक्षा १० श्रमिक दोन शिफ्टमध्ये चालवत प्रवासी वर्गाला सेवा देण्याचे कार्य करीत आहेत. त्यामुळे या पाच आणि हात रिक्षाचालक चालवत असलेल्या २० अशा एकूण २५ ई-रिक्षा सध्या माथेरानकरांसह पर्यटकांना सेवा पुरवत आहे.

### श्रमिकांमध्ये नाराजी

माथेरानमधील माणसाने माणसाला ओढण्याची प्रथा बंद करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने सर्व हातरिक्षा बंद करून सर्व श्रमिकांचे पुनर्वसन करण्याच्या आदेशाची अंमबजावणी करण्याचे आदेश शासनाला दिले आहेत. त्यानुसार आतापर्यंत ३० श्रमिकांच्या हाती ई-रिक्षा आल्या आहेत; मात्र, बाकी श्रमिकांच्या हाती ई-रिक्षा आल्या नसल्याने श्रमिकांमध्ये नाराजी आहे.

### सर्वोच्च न्यायालयाचा अवमान

पर्यटन हंगामात माथेरान शहरात हुतात्मा स्मारक आणि दस्तुरी येथे असलेल्या ई-रिक्षा स्टॅन्डवर प्रवासी वर्गाला तासन्तास थांबून राहावे लागत आहे. त्यामुळे ई-रिक्षांची संख्या वाढवण्यासाठी देण्यात आलेली सहा महिन्याची मुदत संपत आली असून, माथेरान नगरपरिषद आणि महाराष्ट्र शासन सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करीत असल्याचे दिसून येत आहे. तसेच, माथेरानमध्ये वाहनांना बंदी असल्यामुळे पोलिसांना देखील वाहने शहरात चालवता येत नाहीत. त्यामुळे त्यांनाही एक ई-रिक्षा दिली जावी, अशी मागणी केली जात आहे.

**इंडस्ट्रियल इलेक्ट्रिशियन - भरती**
खोपोली स्थित मल्टीनॅशनल कंपनीसाठी अनुभवी इंडस्ट्रियल इलेक्ट्रिशियन आवश्यक
शैक्षणिक पात्रता व अनुभव:
५ वर्षांचा इंडस्ट्रियल इलेक्ट्रिशियन म्हणून अनुभव आवश्यक.
खालील कामांचा अनुभव असणे आवश्यक:
- स्टार-डेल्टा स्टार्टर वायरिंग व मोटर कनेक्शन
- VFD वायरिंग, कनेक्शन व पॅरामीटर सेटिंग
- इलेक्ट्रिकल पॅनल वायरिंग
- इन्स्ट्रुमेंटेशन वायरिंग
- जनरेटर पॅनल कनेक्शन
- AMF पॅनल कनेक्शन व ट्रबलशूटिंग

इतर माहिती:
कंपनीतर्फे सर्व आवश्यक सुविधा व आकर्षक पगार दिला जाईल.
gumpro DRILLING FLUIDS
इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा:
hr@gumprodf.com
संपर्क : 022- 2579 3280
KParth

# जंतरमंतरचे धक्के

जंतरमंतरवरील आंदोलनामुळे भाजपचा पाया हलला आहे. अनेक रीतीने त्याचे प्रत्यंतर येत आहे. परवा स्वातंत्र्यदिनाला पंतप्रधान मोदींनी विकासाचे फायदे तुम्हालाच होणार आहेत असे आवाहन करून तरुणांना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला. मोहन भागवतांना एकाएकी जेन झीशी संवाद करायला हवा याचा साक्षात्कार झाला. इतर अनेक नेते इन्स्टाग्रामवर रील्स टाकू लागले आहेत. भाजपने सोमवारी जी नवी राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर केली तिच्यातही याचेच प्रत्यंतर पडलेले दिसते. जेपी नड्डा यांची मुदत संपून गेल्यानंतरही जवळपास अडीच वर्षे अध्यक्षपदी राहिले होते. मग एकाएकी बिहारमध्ये साधे आमदार असलेल्या नितीन नबीन यांना नेमण्यात आले. थोडक्यात मोदी आणि शहा सांगतील त्याला मान डोलावणारा एक होयबा प्रमुख पदावर बसला. आता नबीन यांना आपली कार्यकारिणी तयार करण्यास सात महिने लागले. मधल्या काळात बंगालच्या निवडणुकांमध्ये भाजपने अभूतपूर्व विजय मिळवला. पण खुद्द नबीन यांनी रिकाम्या केलेल्या आमदारकीच्या जागेवर बिहारमध्ये भाजपचा पराभव झाला आणि तिथे प्रशांत किशोर निवडून आले. या पराभवातही जंतरमंतर आंदोलनाचे योगदान होतेच. आता नबीन यांच्या कार्यकारिणीतही त्याचे पडसाद दिसतात. इतकी वर्षे आयटी सेलचे प्रमुख असलेले अमित मालवीय यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. नेहरु, गांधी परिवाराची बदनामी करणे हा या मालवीयांचा मुख्य धंदा होता. कोणत्याही थराला जाऊन विरोधकांवर चिखल फेक करणे आणि आपल्या लक्षावधी ट्रोल्सना ती करायला लावणे हे त्यांचे कसब होते. पण जंतरमंतरवरच्या आंदोलक विद्यार्थ्यांनी या मालवीय टाईप चिखलफेक्यांना चांगले प्रत्युत्तर दिले. आमच्या नादाला लागाल तर आम्ही याच्याही पेक्षा वाईट भाषा व शिव्या वापरू शकतो हे त्यांनी मालवीय व भाजपला दाखवून दिले. त्याने भाजपवाले असे काही हादरून गेले आहेत की आता त्यांना संस्कार वगैरेंची आठवण झाली आहे. मालवीय यांच्याकडे विद्यार्थ्यांच्या या आक्रमणाला उत्तर नसल्याने त्यांना घालवण्यात आले आहे. त्यांच्या जागी छत्तीसगडचे म्हस्के यांना आणण्यात आले आहे. म्हस्के हे उच्चशिक्षित व्यावसायिक असून ते अधिक सभ्यपणे वागतील अशी आशा आहे.

## गोयल यांना मंत्रिपदावरून काढा

राम माधव या संघाच्या प्रतिनिधीला पुन्हा स्थान द्यावे लागले आहे. २०२० मध्ये त्यांना घालवण्यात आले होते. त्यानंतर निवडणुका जिंकण्यासाठी आम्हाला संघाची गरज नाही असे नड्डा म्हणाले होते. त्याचा फटका लोकसभेला बसला आणि आता तर विद्यार्थी आंदोलनाने वातावरणच फिरवले. त्यामुळे पुन्हा एकदा संघाला शरण जाणे मोदी शहांना भाग पडले आहे. राहुल गांधी यांच्याविरुध्द पराभूत झाल्यानंतर स्मृती इराणी यांना अडगळीत फेकून देण्यात आले होते. नुकत्याच संपलेल्या संसद अधिवेशनात राहुल गांधी यांनी मोदींच्या घरासमोर केलेले आंदोलन आणि नंतर अमित शहा यांना दिल्ली लाठीमारावरून केलेले सवाल यामुळे भाजपची कोंडी झाली. मोदी व शहा वीस दिवस लोकसभा व राज्यसभेत येण्याची हिंमत करू शकले नाहीत. हा राहुल यांचा मोठा विजय होता. यामुळे राहुल यांच्यावर हल्ला करण्यासाठी बहुदा स्मृती इराणी यांना मैदानात उतरवलेले दिसते. राहुल यांच्याकडून पुढच्या वेळी अमेठीची जागा पुन्हा खेचून घेण्याचा प्रयत्न राहील असाही त्याचा अर्थ आहे. राहुल यांना सावध होऊन आतापासूनच कामाला लागावे लागेल. पियुष गोयल यांना कोषाध्यक्ष करण्यात आले आहे. गोयल हे वाणिज्यमंत्री आहेत. अमेरिकेसोबतच्या आपल्या व्यापार करारात वाटाघाटी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. शिवाय एक मंत्री म्हणून तमाम देश व परदेशातल्या कंपन्यांशी त्यांचा संबंध येतो. अशा स्थितीत त्यांनी खरे तर मंत्रिपदाचा राजीनामा द्यायला हवा. अन्यथा, मंत्रिपद वापरून भाजपसाठी पैसे गोळा करत असल्याचा आरोप त्यांच्यावर होऊ शकतो. गोयल यांचे वडील वेदप्रकाश गोयल हे अनेक वर्षे हीच जबाबदारी सांभाळत होते. एरवी घराणेशाहीवर टीका करणाऱ्या भाजपने मात्र गोयल यांच्या खानदानाला राखायचे ठरवलेले दिसते. ते काहीही असले तरी पियुष यांनी कोषाध्यक्ष व मंत्रिपद एका वेळी सांभाळणे कधीही होऊ देता कामा नये. इलेक्टोरल बाँडच्या नावाखाली ज्या पार्टीने हजारो कोटी रुपये केले व जे नंतर न्यायालयाने बेकायदेशीर ठरवले त्या पार्टीला जनाची लाजलज्जा नाही हे दिसले आहेच. पण तरीही विरोधकांना गोयल यांना मंत्रिपदावरून काढण्याची मागणी करायला हवी.

## फडणवीसांचे काय?

दरम्यान, नबीन आपली कार्यकारिणी जाहीर करीत असतानाच देवेंद्र फडणवीस दिल्लीत होते. त्यांनी पंतप्रधान मोदी, निर्मला सीतारामन व इतर काही मंत्र्यांची भेट घेतली. गेले काही दिवस फडणवीस दिल्लीला जाणार अशी चर्चा सुरू आहे. पण देवेंद्रांनी सोमवारी त्याचा इन्कार केला. रिकामटेकडे लोक पतंग उडवत असतात, पण मी महाराष्ट्रातच राहणार आहे असे त्यांनी स्पष्ट केले. तूर्तास ते तसेच असले तरी फार काळ ते राहीलच याचा भरवसा कोणीही देऊ शकत नाही. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर फडणवीसांना तातडीने दिल्लीला बोलावून घेतले गेले. आताही त्यांना निवडणूकविषयक समितीवर घेतले गेले आहे. फडणवीसांना केंद्रात मंत्री करून २०२९ ची तयारी करायची असे भाजपचे डावपेच असतील असा सर्वसाधारण तर्क आहे. उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची लोकप्रियता सध्या मोदींच्या खालोखाल असून हिंदी पट्ट्यात मोदींनंतर योगीच आले पाहिजेत असे अनेकांना वाटते. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला योगी फारसे पसंत नाहीत. त्यामुळे संघवाले फडणवीसांचे नाव पुढे करत आहेत असे म्हणतात. अमित शहा हे सध्या मंत्रिमंडळात दुसऱ्या क्रमांकावर असले तरी दिल्ली लाठीमार तसेच मणिपूर प्रकरणाने त्यांची नाचक्की झाली आहे. निवडणुका जिंकण्यात त्यांचा हातखंडा असला तरी वातावरण फिरले तर ते कितपत तोंड देऊ शकतील याबाबत शंका आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार लवकरच होण्याचा अंदाज आहे. मध्यंतरी दोन मंत्र्यांचा राज्यसभा कालावधी न वाढवल्याने त्यांची खासदारकी गेली व मंत्रिपदही सोडावे लागले. आता पियुष गोयल यांच्याबाबत काहीतरी निर्णय घ्यावा लागेल. धर्मेंद्र प्रधान यांच्या जागी आलेले प्रल्हाद जोशी यांच्याकडे आधीपासूनच अनेक खाती आहेत. निर्मला सीतारामन यांची कामगिरी मोदींना फार पसंत नाही असे म्हणतात. बाईंचा आवाज अलिकडे बंद आहे. या स्थितीत फडणवीसांवर दिल्लीत नवी जबाबदारी देणे हे घडू शकते. विनोद तावडे हे राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून कायम राहिले आहेत. त्यांच्या जोडीने त्यांच्याशी अजिबात न पटणारे फडणवीस हेही दिल्लीत जाणे हे मजेशीर असेल. आता फडणवीसांनी छातीठोकपणे आपण महाराष्ट्रातच राहणार असे सांगितल्याने त्याच्यावर विश्वास ठेवणे भाग आहे. पण हेच फडणवीस राष्ट्रवादीशी युती नाही नाही नाही असे तीनदा म्हणाले होते. काहीच दिवसात त्यांना आपले शब्द गिळावे लागले होते. आता तसेच पुन्हा होणार नाही याचा कोण भरवसा देईल?

विचार

# चीनमध्ये पुन्हा कोरोना, भारत सतर्क

*कोणताही विषाणू राष्ट्रीय सीमा मानत नाही आणि आरोग्य व्यवस्थेतील कमकुवतपणा लपवून ठेवता येत नाही, हे कोरोनाने जगाला दिलेले दोन धडे. चीनच्या वुहानमधून सुरू झालेला कोरोना संसर्ग काही महिन्यांमध्ये जगभर पोहोचून लाखो मृत्यू, उद्ध्वस्त अर्थव्यवस्था आणि पुढचा अनर्थ ओढवला. म्हणूनच चीनमध्ये पुन्हा संसर्ग वाढत असल्याची बातमी जगातील प्रत्येक देशासाठी सतर्कतेचा संदेश घेऊन येते.*



प्रा.जयसिंग यादव

कोरोना महामारीला सुरुवात होऊन सहा वर्षांचा काळ उलटला असला, तरी कोविड-१९ हा इतिहासजमा झालेला आजार नाही, हे चीनमधून समोर आलेल्या नव्या आकडेवारीने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. चीनमध्ये गेल्या काही आठवड्यांमध्ये कोविड-१९ च्या रुग्णसंख्येत वाढ झाली असून ओमिक्रॉनचा एनबी १.८.१ हा उपप्रकार वेगाने पसरत आहे. जून महिन्यात चीनमध्ये कोरोनाचे जवळपास ७९ हजार नवे रुग्ण आढळले, पॉझिटिव्हिटी दर १६.३ टक्क्यांवर पोहोचला आणि यंदा प्रथमच कोविडने इन्फ्लूएंझालाही मागे टाकले; मात्र या वेळी परिस्थिती २०२० किंवा २०२१ सारखी भीषण नाही. बहुसंख्य रुग्णांमध्ये सौम्य लक्षणे असून मृत्यूचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे या घडामोडीकडे भीतीने नव्हे, तर सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या दृष्टीने एक गंभीर इशारा म्हणून पाहण्याची गरज आहे. अर्थात परिस्थितीतील एक महत्त्वाचा बदल लक्षात घेतला पाहिजे. तीव्रता पूर्वीइतकी राहिली नसली तरी कोरोनाचा विषाणू अजूनही बदलत आहे. 'ओमिक्रॉन'च्या उपप्रकारांमुळे संसर्ग झपाट्याने होतो; मात्र गंभीर आजार होण्याचे प्रमाण कमी आहे. याचे मुख्य कारण म्हणजे गेल्या काही वर्षांमध्ये जगातील मोठ्या लोकसंख्येला लसीकरणाचा लाभ झाला आहे. अनेकांना नैसर्गिक संसर्गही झाला आहे. त्यामुळे समाजात काही प्रमाणात सामूहिक प्रतिकारशक्ती निर्माण झाली आहे. याचा अर्थ धोका संपला आहे, असा होत नाही; पण आरोग्यव्यवस्थेची त्याचा सामना करण्याची क्षमता निश्चितच वाढली आहे, तरीही चीनमधील आकडे काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करतात.

उन्हाळ्यात कोविडची वाढ का झाली? यापूर्वी हिवाळा हा श्वसन संसर्गाचा हंगाम मानला जात होता. आता मात्र एअर कंडिशनर असलेल्या बंद जागांमध्ये अधिक वेळ घालवणे, पर्यटन आणि प्रवासात वाढ, तसेच बदलत्या हवामानामुळे विषाणूच्या प्रसाराचे स्वरूपही बदलले आहे. म्हणजेच कोविड आता ऋतूंवर अवलंबून राहिलेला नाही. तो वर्षभर अधूनमधून डोके वर काढू शकतो. त्यामुळे हिवाळ्यातच नव्हे, तर वर्षभर सार्वजनिक आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवावी लागणार आहे. यामधील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विषाणूचे उत्परिवर्तन. प्रत्येक संसर्गासोबत विषाणूमध्ये लहान-मोठे बदल होत असतात. एनबी १.८.१ हा अशाच बदलांमधून निर्माण झालेला उपप्रकार आहे. आज तो तुलनेने सौम्य आहे; पण भविष्यातील प्रत्येक उपप्रकारही तसाच असेल, याची कोणतीही हमी नाही. कोविडच्या पहिल्या टप्प्यात अल्फा, त्यानंतर डेल्टा आणि मग ओमिक्रॉन या प्रकारांनी जगाला वेगवेगळ्या प्रकारे हादरवले. त्यामुळे जनुकीय तपासणी आणि विषाणूंच्या सततच्या निरीक्षणाला आजही तितकेच महत्त्व आहे. भारतोच्या दृष्टीने सध्या घाबरण्याचे कारण नसले, तरी निष्काळजी राहण्याचेही कारण नाही. देशात सक्रिय रुग्णसंख्या अत्यल्प आहे. काही राज्यांमध्ये तुरळक रुग्ण आढळत असले, तरी रुग्णालयांवरील ताण वाढलेला नाही; परंतु भारतासारख्या १४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशात कोणताही संसर्ग वेगाने पसरू शकतो. त्यामुळे सीमावर्ती तपासणी, विमानतळांवरील देखरेख, संशयित नमुन्यांचे जनुकीय विश्लेषण आणि राज्यांच्या आरोग्य यंत्रणांमधील समन्वय सातत्याने मजबूत ठेवणे गरजेचे आहे.

कोविडच्या काळात भारताने अनेक यशस्वी प्रयोग केले. कोविडसारखी डिजिटल लसीकरण व्यवस्था, मोठ्या प्रमाणावर लसींचे उत्पादन, कमी वेळात उभारलेली कोविड रुग्णालये, ऑक्सिजन उत्पादनातील वाढ आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे योगदान यामुळे भारताला जागतिक स्तरावर प्रशंसा मिळाली; मात्र दुसऱ्या बाजूला दुसऱ्या लाटेतील ऑक्सिजनचा तुटवडा, ग्रामीण भागातील अपुरी आरोग्य सेवा, रुग्णवाहिकांची कमतरता आणि खासगी आरोग्य व्यवस्थेतील आर्थिक शोषणही तितकेच वास्तव होते. या अनुभवांतून कायमस्वरूपी सुधारणा झाल्या का, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. भारताच्या सार्वजनिक आरोग्य खर्चाचे प्रमाण आजही विकसित देशांच्या तुलनेत कमी आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये, संसर्गजन्य रोग संशोधन प्रयोगशाळा आणि प्रशिक्षित मनुष्यबळ यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीची आवश्यकता आहे. महामारी आली, की यंत्रणा उभारण्यापेक्षा शांत काळातच मजबूत पायाभूत सुविधा उभ्या करणे अधिक शहाणपणाचे ठरते. दुर्दैवाने भारतासह अनेक देशांमध्ये संकट ओसरले, की आरोग्य क्षेत्रावरील लक्ष कमी होते. कोविडने विज्ञान आणि समाज यांच्यातील नातेसंबंधाचाही कस लावला. महामारीच्या काळात अफवा, 'सोशल मीडिया'वरील दिशाभूल, बनावट औषधे, चमत्कारी उपचार आणि लसींबाबतच्या गैरसमजांनी मोठे नुकसान केले. विज्ञानावरील विश्वास डळमळीत करण्याचा प्रयत्न झाला. आज पुन्हा कोविडची चर्चा सुरू होत असताना समाजाने हा धडा विसरू नये. कोणतीही माहिती अधिकृत आरोग्य संस्थांकडूनच तपासून घेणे, अप्रमाणित संदेश पुढे न पाठवणे आणि वैज्ञानिक सल्ल्याला प्राधान्य देणे ही आज प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. या नव्या लाटेने आणखी एक वास्तव अधोरेखित केले आहे. कोविड आता एक एन्डेमिक म्हणजेच समाजात कायम अस्तित्वात राहणारा संसर्ग बनत चालला आहे. क्षयरोग, इन्फ्लूएंझा किंवा डेंग्यूप्रमाणे तो अधूनमधून वाढेल, कमी होईल आणि नवे प्रकार निर्माण करेल. त्यामुळे 'कोरोना संपला' किंवा 'पुन्हा महामारी आली' या दोन टोकांच्या विचारांऐवजी 'कोरोनासोबत सुरक्षित सहजीवन' ही नवी संकल्पना स्वीकारावी लागेल.

यामध्ये वैयक्तिक जबाबदारी तितकीच महत्त्वाची आहे. आजही अनेकांमध्ये खोकला, ताप किंवा घशात दुखत असतानाही गर्दीच्या ठिकाणी जाण्याची सवय पहायला मिळते. मास्क वापरण्याबाबतची शिस्त जवळपास संपुष्टात आली आहे. सार्वजनिक स्वच्छता आणि हात धुण्याच्या सवयीही कमी झाल्या आहेत. महामारीच्या काळात स्विकारलेल्या मूलभूत सवयी कायम ठेवण्यातच भविष्यातील अनेक संसर्गांपासून संरक्षण आहे. विशेषतः वृद्ध, गर्भवती महिला, लहान मुले, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग किंवा प्रतिकारशक्ती कमी असलेल्या व्यक्तींनी अधिक काळजी घेण्याची गरज आहे. आवश्यक असल्यास बूस्टर डोस घेणे, गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरणे आणि लक्षणे आढळल्यास त्वरित तपासणी करणे ही साधी पावलेही मोठे संकट टाळू शकतात. जागतिक आरोग्य व्यवस्थेसाठीही हा प्रसंग महत्त्वाचा आहे.

कोविडच्या सुरुवातीच्या काळात उशिरा माहिती देणे, संसर्गाचे खरे प्रमाण लपवणे आणि जागतिक संस्थांशी समन्वयाचा अभाव यावर अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. भविष्यात अशा चुका परवडणाऱ्या नाहीत. कोणत्याही देशात नवीन प्रकार आढळल्यास त्याची माहिती त्वरित जगासमोर ठेवणे, संशोधनासाठी नमुने उपलब्ध करून देणे आणि लस उत्पादकांशी समन्वय राखणे ही आता आंतरराष्ट्रीय जबाबदारी झाली आहे. कोविडने जागतिक अर्थव्यवस्थेचेही गणित बदलले. पुरवठा साखळी विस्कळीत झाली, उत्पादन थांबले, पर्यटन कोलमडले आणि महागाई वाढली. त्यामुळे एखादी लहानशी आरोग्य समस्यादेखील किती मोठ्या आर्थिक संकटात रूपांतरित होऊ शकते, हे जगाने अनुभवले आहे. त्यामुळे आरोग्य सुरक्षेला राष्ट्रीय सुरक्षेइतकेच महत्त्व देण्याची वेळ आली आहे. चीनमधील वाढती रुग्णसंख्या ही आजच्या घडीला महामारीची घंटा नाही; परंतु निष्काळजीपणाविरुद्धचा स्पष्ट इशारा आहे. विषाणू बदलतो, परिस्थिती बदलते आणि समाजालाही बदलावे लागते. कोविडचे भय कमी झाले असले, तरी त्याचे अस्तित्व संपलेले नाही. त्यामुळे घाबरण्यापेक्षा सजग राहणे, विज्ञानावर विश्वास ठेवणे, आरोग्य व्यवस्था सक्षम करणे आणि नागरिकांनी जबाबदार वर्तन करणे हीच भविष्यातील खरी रणनीती ठरेल. आज चीनमध्ये दिसणारी परिस्थिती उद्या इतर देशांमध्येही दिसू शकते; मात्र २०२० प्रमाणे जग पुन्हा गाफील राहण्याची चूक करणार नाही, अशी अपेक्षा आहे. कोरोना महामारीने मानवजातीला मोठी किंमत मोजायला लावली. त्या अनुभवातून शिकून सार्वजनिक आरोग्य, संशोधन, पारदर्शकता आणि नागरिकांची जागरूकता यांचा मजबूत पाया उभारला, तर कोविडचे पुनरागमन ही भीतीची नव्हे, तर तयारीची परीक्षा ठरेल. या परीक्षेत यशस्वी होणे हे केवळ सरकारचे नव्हे, तर संपूर्ण समाजाचे सामूहिक उत्तरदायित्व आहे.

चर्चा आजची

# सणाचे बाजारीकरण



वैभव पाटील

सध्या सण, उत्सवाचे दिवस चालु झाले आहेत. आता गोकुळाष्टमी, गणेशोत्सव, असे उत्सव पार पडणार आहेत. हे सर्वच सण, उत्सव हल्ली मोठ्या धडाक्यात साजरे केले जातात. ढोलताशे, डीजे, लेझर, रोषणाई, झगमगाट, फटाक्यांची आतिषबाजी, नाचगाण्यांचा दणदणाट, प्रचंड मिरवणुका, देखावे, बक्षीसांची खैरात. या सगळ्या उत्सवी गोंगाटात रोजगार, महागाई, भ्रष्टाचार या सर्व घटना दबल्या गेल्या आहेत. पण सण, समारंभ, उत्सव साजरे करण्याची माणसाची भावना जुनी आहे, जसजसा माणूस उत्क्रांत होत गेला, समाजव्यवस्थेत बदल होत गेले तसतसे सण, समारंभ, उत्सव साजरे करण्याच्या आनंद व्यक्त करण्याच्या त्याच्या पद्धतीतही बदल होत गेले.

सण-उत्सव हे आपल्या संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. परंपरेने चालत आलेले ह्या उत्सवाचे स्वरूप आजच्या घडीला बदलले असले तरी पूर्णतः ते संपुष्टात आलेले नाही. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते संक्रमित होत आलेले आहे. आणि आपणही हे सण-उत्सव तितक्याच आनंद व उत्साहाने साजरे करतो. पूर्वापार चालत आलेल्या या उत्सवांनी मानवी जीवनाला संजीवनी देण्याचे काम केलेले आहे. मानवी नाते-संबंध, आपुलकी, जिव्हाळा, कृतज्ञता, संवेदनशीलता यांना खतपाणी घालण्याचे काम सण-उत्सव करीत आले आहे. शारीरिक, मानसिक, वैचारिक, बौद्धिक या घटकांचे पोषण करणारे असे होते. मनोरंजनाचा व करमणुकीचा भाग जरी त्यात असला तरी आचार-विचारांनी उत्तम पिढ्या घडवण्याचे कार्य हे उत्सव करीत असत. समाजात जे-जे म्हणून चांगले आहे हे सगळ्यांपर्यंत पोहोचवणे आणि समाजातील वाईट, चुकीचे जे आहे त्यावर बोट ठेवून निषेध करणे म्हणजे एकप्रकारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य या उत्सवांनी केले आहे. प्रत्येक उत्सवामागे समता, बंधुता हि जीवनमुल्य दडलेली आहेत. तुम्ही जर शोधली तर ती तुम्हाला सापडतील. परंतु आपण मात्र, आजच्या घडीला त्याला केवळ करमणुकीचे साधन म्हणून पाहत आहोत आणि इच्छांची पोळी त्यावर भाजत आहोत. आधीच्या उत्सवाचे संस्कार वातावरण जाऊन त्याची जागा चंगळवादी वृत्ती आणि प्रदूषणाने घेतली. ध्वनी प्रदूषण, जल प्रदूषण फार मोठ्या प्रमाणात होऊ लागले. त्यातून आरोग्याला धोका पोहोचू लागला. वाट्टेल तसे भले मोठे मंडप घालणे, लायटिंग करणे, मोठ्या आवाजात लाऊड स्पीकर लावणे हे तर नित्याचेच होऊन बसले म्हणजे खरे तर देव असे म्हणत नाही की असा अवाजवी खर्च करून आमचे स्वागत करा; पण लोकांनी देवालाही सुध्दा स्पर्धेत उतरवले आहेत.

कुठल्या मंडळाची सजावट चांगली त्यावर क्रमांक दिल्या गेले. पण असे करून देव थोडाच प्रसन्न होणार आहे. त्याला तर मनोभावे केलेला नमस्कारही पोहोचतो. खोट्या दिखाव्याची त्याला आवश्यकता नाही. म्हणजे इथे सुद्धा मानवाने आपल्या इच्छा, अपेक्षा त्याच्यावर लादल्या पण कायम देवाकडे काही मागण्यापेक्षा आपल्याला दाता ही होता आले पाहिजे. समजला, नव्या घडणाऱ्या पिढीला आपल्याकडून जितके म्हणून काही चांगले देता येईल असे आपण वागले पाहिजे. ज्ञानात, बुद्धीत भर पाडणाऱ्या संस्कारक्षम स्पर्धा आपण आयोजित केल्या पाहिजेत. त्यांच्यात दडलेल्या सुप्त गुणांना वाव मिळेल. आणि हसत-खेळत आनंदी वातावरणाची निर्मिती करून अगदी सहजरित्या आपण त्यांना बोधामृत देऊ शकू,असे काहीतरी करायला हवे. आजची एकंदरीत सामाजिक स्थिती पाहता ती बदलण्यासाठी व त्याच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी खरे तर उत्सवांचे आयोजन असते. हीच त्यामागील प्रमुख भूमिका व उद्दिष्ट होय. परंतु, निरर्थक असे वेळ वाया घालवणाऱ्या कर्यक्रमांचे प्रस्थ हल्ली खूप वाढल्याचे आपल्याला दिसून येईल. घरगुती अगदी साध्या पद्धतीने साजरे केले जाणाऱ्या उत्सवांना आपण उगाच मोठे स्वरूप दिले. परंतु दिखाव्याने उद्दिष्ट साध्य होत नाही त्याकरिता कृतीला विचारांची जोड हवी. अजूनही वेळ गेलेली नाही आपण जर ठरवले तर आपली उत्सवांची ही संस्कृती जपू शकू व तिचे संवर्धन करू शकू.

लोकसंसद

## भीषण चेंगराचेंगरीची आणखी एक दुर्घटना

व्रत वैकल्यांच्या श्रावण महिन्यात नागपंचमी आणि श्रावणी सोमवारच्या दुहेरी शुभयोगामुळे बिहारमधील लखीसराय येथील सुप्रसिद्ध अशोकधाम मंदिरात दर्शनासाठी अलोट गर्दी उसळली. त्यावेळी झालेल्या भीषण चेंगराचेंगरीत ७ महिला भाविकांना आपला जीव गमवावा लागला. तर अनेक भाविक जखमी झाले. या दुर्दैवी घटनेमुळे मंदिराच्या परिसरात चेंगराचेंगरी होऊन भाविक मृत्युमुखी पडल्याच्या आणखी एका घटनेची इतिहासात नोंद झाली. कारण मंदिरांच्या ठिकाणी चेंगराचेंगरीच्या अशा प्रकारच्या दुर्दैवी घटना यापूर्वी देशात अनेकवेळा घडल्या आहेत. खरे तर आपल्या देशात धार्मिक उत्सव आणि यात्रांना खूप मोठी सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा आहे. मात्र दुर्दैवाने अलीकडच्या काळात या पवित्र तीर्थक्षेत्रांना चेंगराचेंगरीच्या दुर्घटनांचे ग्रहण लागले आहे. मंदिराचा मर्यादित परिसर एकाचवेळी अफाट गर्दीला सामावून घेऊ शकत नाही. त्यातच मंदिर ट्रस्ट आणि स्थानिक प्रशासन यांच्यात अनेकदा योग्य समन्वयाचा अभाव असतो. अचानक पसरणाऱ्या खोट्या अफवांमुळे भाविकांमध्ये भीती निर्माण होते. अशा संकटाच्या वेळी बाहेर पडण्यासाठी पुरेसे मार्गही नसतात. परिणामी चेंगराचेंगरी होऊन भाविकांचा नाहक बळी जातो. वास्तविक आपल्या धार्मिक स्थळांचे पावित्र्य जितके महत्त्वाचे आहे तितकेच भाविकांचे जीवही महत्त्वाचे आहेत. सरकारने अशा दुर्घटना पुन्हा घडू नयेत म्हणून ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. भाविक म्हणून अशा ठिकाणी आपणही शिस्त पाळणे गरजेचे आहे. **-प्रदीप अनुसया शंकर मोरे**

दिनविशेष

# सत्यशोधक कर्मवीर रावसाहेब भाऊसाहेब थोरात

कर्मवीर रावसाहेब थोरात हे नाशिक जिल्ह्यातील एक महान समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि प्रसिद्ध मराठा विद्या प्रसारक समाज (मविप्र) संस्थेचे आद्य संस्थापक व प्रवर्तक होते. कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्म १९ ऑगस्ट १८९० रोजी कसबे सुकणे (ता. निफाड) येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव श्रीभाऊ सखाराम पाटील- थोरात असे होते. त्यांच्या पत्नीचे नाव पार्वतीबाई उर्फ नानी थोरात असे होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण वणी (ता. दिंडोरी) येथे झाले. त्यांचे प्राथमिक शिक्षण सेंट जॉर्ज हायस्कूल, नाशिक येथे झाले. त्यांच्यावर सत्यशोधक समाजाच्या विचारसरणीचा प्रभाव होता.

रावसाहेब थोरात हे संस्थेचे आद्य संस्थापक होय. बहुजन समाजातील शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण पाहून राजर्षी शाहू महाराज थोर समाजसेवक गणपतदादा मोरे, कॅप्टन डी. आर. भोसले आणि किर्तीवानराव निंबाळकर यांच्याबरोबर समाजजागृतीच्या कार्याने प्रभावित होऊन संस्थेच्या कार्याला त्यांनी स्वतःला वाहून घेतले. जुलै १९१४ मध्ये नाशिक शहरातील राठी भवन इमारतीत वसतिगृह सुरू करून त्यांनी संस्थेचे रोपटे लावले तेव्हा ते अवघ्या २४ वर्षाचे होते. त्यानंतर अखेरपर्यंत मोलाचे योगदान देत आयुष्यभर संस्थेच्या संगोपन कार्यात त्यांनी स्वतःला वाहून घेतले. ग्रामीण भागात त्यांनी गावोगावी फिरून शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण घेण्याबाबत पालकांचे मन वळविले. शेतकरी, ग्रामीण लोकांमध्ये शिक्षणाचे महत्व बिंबविले. १९४१ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांना 'रावसाहेब' ही पदवी दिली. संस्थेने त्यांच्या कार्याची माहिती, तसेच नव्या पिढीला आदर्श ज्ञात व्हावा म्हणून 'केटीएचएम' महाविद्यालय नाशिक, माध्यमिक विद्यालय वणी, कनिष्ठ महाविद्यालय, मौजे सुकेणे, माध्यमिक शाळा मोहाडी आणि संस्थेच्या सभागृहाला त्यांचे नाव दिले. १९८२ पासून त्यांचा जन्मदिन संस्थेतर्फे 'समाजदिन' म्हणून साजरा केला जातो. नाशिक जिल्हा बोर्डाचे ते अध्यक्ष होते. मुंबई प्रांत विधिमंडळात व मुंबई राज्य विधानसभेत आमदार म्हणूनही त्यांनी कार्य केले. १३ मार्च १९५८ ला कोल्हापूर येथे त्यांचे निधन झाले. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हे ब्रीद अंगीकारून तसेच बहुजन सेवा हीच ईश्वर सेवा व मविप्र समाज हाच आपला संसार मानून संस्थेच्या कार्यविस्तारात आणि कार्य प्रशासनात कर्मवीर रावसाहेब थोरात यांच्याबरोबर अण्णासाहेब मुरकुटे, पदमश्री काकासाहेब वाघ, भाऊसाहेब हिरे, गणपतदादा मोरे, डी. आर. भोसले यांचा सिंहाचा वाटा होता. संस्थेच्या सुवर्ण महोत्सवापूर्वी व त्यानंतरच्या दीर्घ कालखंडात संस्थेचे मार्गदर्शक ॲड. बाबुराव ठाकरे व आधारस्तंभ कै. ॲड. विठ्ठलराव हांडे यांनी संस्थेची धुरा समर्थपणे सांभाळून मविप्रच्या कार्याला प्रचंड गती देऊन कार्यविस्तार व विकास केला. कै. डॉ. वसंतराव पवार यांनी शिस्त, गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसुत्रीचा अवलंब करत संस्थेच्या गुणवत्ता व कार्य विस्तारात सिंहाचा वाटा उचलून बहुमूल्य योगदान दिले. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे, यासाठी १९१४ मध्ये या संस्थेची स्थापना झाली. म. फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी कर्वे आदी महान विभूतींच्या कार्यातून प्रेरणा घेत कर्मवीर रावसाहेब थोरात तसेच, इतर कर्मवीरांनी संस्थेची स्थापना केली. संस्थेने आजपर्यंत अनेक गुणवंत विद्यार्थी घडवले आणि भविष्यात गुणवंत विद्यार्थी संस्थेच्या माध्यमातून घडत राहतील. मविप्र समाज संस्थेच्या आद्य कर्मवीरांपैकी एक असणारे अर्थातच कर्मवीर रावसाहेब थोरात. त्यांनी संस्थेसाठी अतिशय भरीव असे योगदान दिले. संस्था स्थापन करण्यापासून ते संस्थेचा विकास त्यांनी घडवून आणलेला आहे. त्यांचे हे संस्थेसाठीचे कष्ट पाहता, आपली संस्था सन १९८२ पासून कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्मदिवस म्हणजेच १९ ऑगस्ट मराठा विद्या प्रसारक समाजदिन म्हणून साजरा करत असते. शिक्षणप्रसार हीच देशभक्ती या श्रध्देने मविप्र समाज संस्था कार्य करत आली आहे आणि करत राहील. स्वहित बाजूला ठेवून कार्य केलेल्या सर्व समाजधुरिणांना मानाचा मुजरा !

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१९ ऑगस्ट

१) श्री.अशोक प्रभाकर देशमुख ब्राह्मणआळी, अलिबाग, दि.१९-८-१९४६

२)श्रीमती.संगीता दामोदर पडते मु.गुंजीस, अलिबाग, दि.१९-८-१९४७

३)श्रीमती.आशा आत्माराम प्रधान प्रधानआळी, अलिबाग दि.१९-८-१९४१

४)श्री.संतोष गजानन गोडबोले अलिबाग, दि.१९-८-१९६३

५)श्री.श्रीरंग यशवंत गुरव वरसोली, विद्यानगर, अलिबाग दि.१९-८-१९६१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## महिला उद्योजकता मार्गदर्शन कार्यक्रम


**खांब** : महिलांनी पारंपरिक चौकटीत न राहता स्वतःचा व्यवसाय उभारून आर्थिकदृष्ट्या सक्षम व आत्मनिर्भर गरजेचे आहे. यासाठी योग्य मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी महिला उद्योजकता मार्गदर्शन व प्रमाणपत्र वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. श्री विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, रोहा यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणामध्ये एकूण ५० महिलांनी सहभाग घेऊन बेसिक टेलरिंग, फॅशन डिझाईन आणि आरी वर्क या कौशल्याधारित प्रशिक्षणांचा महिलांनी लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व मान्यवर, प्रशिक्षक, आयोजक व प्रशिक्षणार्थी महिलांचे सहकार्य लाभले.

# आरोग्य व्यवस्था होणार बळकट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात उपलब्ध झालेल्या १,४४० डॉक्टरांची येत्या काही दिवसांत नियुक्ती करण्यात येणार आहे. आणखी ६०० डॉक्टरांसाठी जाहिरात काढण्यात येत असून, सुमारे २५० दंतचिकित्सकही लवकरच आरोग्य सेवेसाठी उपलब्ध होतील, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या महिला आरोग्य समिती, जन आरोग्य समिती आणि रुग्णकल्याण समितीच्या सदस्यांशी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी ऑनलाइन पद्धतीने 'जन आरोग्य संवाद' साधला. आरोग्य समित्यांच्या माध्यमातून आतापर्यंत सहा लाखांहून अधिक नागरिकांशी



- **१,४४० डॉक्टरांची लवकरच नियुक्ती**
- **आरोग्यमंत्री आबिटकरांची माहिती**

संवाद साधण्यात आला आहे. भविष्यात आणखी चार लाख नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेत त्या सोडविण्यात येणार असल्याचे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सांगितले.

या संवादात आरोग्य समित्यांच्या बैठका नियमित होतात का, डॉक्टर वेळेवर उपस्थित राहतात का, डॉक्टरांचा रुग्णांशी योग्य संवाद होतो का आणि रुग्णालयांमध्ये आवश्यक सेवा उपलब्ध आहेत का, याची माहिती घेण्यात आली. स्थानिक पातळीवरील अडचणी समजून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्यावर भर दिला जाणार आहे. आरोग्य व्यवस्था कागदावर नव्हे, तर प्रत्यक्ष रुग्णालयात आणि नागरिकांच्या अनुभवातून दिसली पाहिजे, असे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले.

माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आरोग्य विभागाशी संबंधित तक्रारींसाठी स्वतंत्र डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्याची सूचना केली. तसेच शासकीय दवाखान्यांमध्ये अनुपस्थित राहणाऱ्या डॉक्टरांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आठवड्यातून एक दिवस निश्चित करावा, असेही त्यांनी सुचविले. या सूचनांना आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

### 'प्रत्येक नागरिकाला दर्जेदार सेवा'

'निरोगी महाराष्ट्र-सुदृढ महाराष्ट्र' या संकल्पनेत नागरिकांचा थेट सहभाग वाढवून आरोग्य सेवांमधील अडचणी समजून घेणे, त्यावर प्रभावी उपाययोजना करणे आणि प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा सार्वजनिक आरोग्य विभागाचा प्रयत्न राहील, असे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सांगितले.

### ऑनलाइन पोर्टल कार्यान्वित करणार

आरोग्य सेवांशी संबंधित तक्रारी आणि समस्या नागरिकांना थेट प्रशासनापर्यंत पोहोचविता याव्यात, यासाठी लवकरच ऑनलाइन पोर्टल कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याद्वारे नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारली जाईल. स्थानिक बचत गटांच्या माध्यमातून रुग्णांना चांगल्या गुणवत्तेचा सकस आणि पोषक आहार उपलब्ध करून देण्याची व्यवस्थाही निर्माण करण्यात येणार, असेही त्यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्य भेट




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील गौळवाडी आणि मांडवणे येथील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि शैक्षणिक विकासाला प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. त्या दृष्टीने टोरेंट पॉवर कंपनीकडून क्रीडा साहित्याचे वाटप करण्याचा कार्यक्रम मांडवणे आणि गौळवाडी या माध्यमिक विद्यालयात आयोजित करण्यात आला होता. गौळवाडी आणि मांडवणे येथील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये समुदाय विकास कार्यक्रम उपक्रमांतर्गत टोरेंट पॉवरने दोन्ही शाळांना क्रीडा साहित्य संच भेट देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या क्रीडा संस्कृतीला चालना मिळावी आणि शारीरिक विकासास प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले.

या क्रीडा साहित्यामध्ये क्रिकेट किट (बॅट बॉल वस्टम) हॉलीबॉल, फुटबॉल, हॉलीबॉल नेट, बॅडमिंटन रॅकेट आणि शटल कॉक तसेच भालाफेक इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सुमारे ८०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच क्रीडा आणि शारीरिक हालचालींचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

## सुधीर देशमुख अध्यक्षपदी बिनविरोध

**। वावोशी । प्रतिधिधी ।**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी येथे झालेल्या ग्रामसभेत सुधीर दत्तात्रेय देशमुख यांची तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या मागील कार्यकाळातील कामाची दखल घेत ग्रामस्थांनी त्यांच्या नेतृत्वावर पुन्हा विश्वास व्यक्त केला. चार वर्षांपूर्वी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर देशमुख यांनी तंटामुक्ती समितीच्या माध्यमातून सामाजिक सलोखा व लोककल्याणकारी उपक्रमांना चालना दिली. तसेच ग्रामपंचायतीच्या जमिनींचे सरकारी सर्वेक्षण करून घेण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तांबाटी ग्रामपंचायतीला विविध पुरस्कार प्राप्त झाले असून नाविन्यपूर्ण योजना व विकासकामांमुळे ग्रामपंचायतीची तालुक्यासह रायगड जिल्ह्यात



वेगळी ओळख निर्माण झाली आहे. पुन्हा निवड झाल्यानंतर सुधीर देशमुख यांनी ग्रामस्थांचे आभार मानत आगामी काळात सर्वांच्या सहकार्याने तंटामुक्ती समितीचे काम अधिक प्रभावीपणे करण्याचे आश्वासन दिले. यावेळी सरपंच अविनाश आमले, ग्रामविकास अधिकारी प्रशांत कदम, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## मोहन बहाडकरांना उत्कृष्ट सेवा पदक

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा पोलीस दलात उत्कृष्ट व उल्लेखनीय सेवा बजावणाऱ्या अधिकारी व अंमलदारांच्या कार्याची दखल घेत, भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार तसेच महाराष्ट्र राज्याच्या पोलीस महासंचालक कार्यालयाकडून उत्कृष्ट सेवा पदक मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये रायगड पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक मोहन दत्तात्रय बहाडकर यांची उत्कृष्ट सेवेसाठी निवड करण्यात आली. त्यांना स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने सन्मानित करण्यात आले.

पोलीस उपनिरीक्षक मोहन बहाडकर यांनी आपल्या सेवाकाळात कर्तव्यनिष्ठा, उत्कृष्ट तपास, शिस्तबद्ध सेवा आणि उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यांच्या या कार्याची शासनस्तरावर दखल घेण्यात आल्याने त्यांना उत्कृष्ट सेवा पदकाने गौरविण्यात आले. मंत्री भरतशेठ गोगावले, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. आंचल दलाल तसेच मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट सेवा पदक बहाल करण्यात आले. मोहन (बाळा) बहाडकर यांना मिळालेला हा सन्मान त्यांच्या उल्लेखनीय पोलीस सेवेला मिळालेली पोचपावती मानली जात आहे.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघटनेचे तालुका कोषाध्यक्ष प्रदीप बाळाराम म्हात्रे यांनी तीन दिवसांत २२ शाळांमध्ये स्वखर्चातून गरिब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व वृक्षारोपणासाठी रोपांचे वाटप करण्यात आले. दोन शाळांमध्ये चॉकलेट वाटप करून ८पेक्षा जास्त झाडे देण्यात आली.

यावेळी सोबत सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे जिल्हा कोषाध्यक्ष जगन्नाथ मोकल पेण तालुका अध्यक्ष राजाराम गावंड यांना सोबत घेऊन पेण तालुक्यातील २२ प्राथमिक शाळांमध्ये जाऊन




तेथील मुख्याध्यापक शिक्षक व पालक शाळा व्यवस्थापन समिती यांची भेट घेऊन विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून रोप देऊन त्यांची जोपासना करण्याचे आवाहन केले. यामध्ये डोंगर दरी असलेल्या शाळा वाड्या वस्त्या येथील शाळा, खोंडावाडी, रानशेत, कासमाल, धनगरमाळ, आसाणी, भोंगोली बांधणी, बंगालवाडी, राणी, बोरगाव येलोशी, इरवाडी, तरणखोप, रामराज, बारिवाडी धावटे, आंबेघर, भोरकस, नांदाडी, धामणी, शेणे, सरेभाग या शाळांमध्ये हे साहित्य वाटप करण्यात आले.

# एआय प्रशिक्षणाचा उत्स्फूर्तपणे शुभारंभ

**। खांब । प्रतिनिधी ।**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, त्याचा शैक्षणिक व व्यावहारिक जीवनात प्रभावीपणे वापर करता यावा, या उद्देशाने मोफत एआय प्रशिक्षण उपक्रमाचा उत्स्फूर्तपणे शुभारंभ करण्यात आला.




विद्यार्थ्यांच्या बदलत्या शैक्षणिक गरजा आणि भविष्यातील तंत्रज्ञानाधारित संधी लक्षात घेऊन साई फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईचे चेअरमन डॉ. असिफ कासकर यांनी पुढाकार घेत हा अभिनव उपक्रम राबविला. रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. आर्थिक परिस्थिती कोणतीही असो, ग्रामीण व सर्वसामान्य विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान मोफत मिळावे आणि भविष्यातील स्पर्धात्मक जगासाठी ते सक्षम व्हावेत, हा या उपक्रमामागील महत्त्वपूर्ण उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रशिक्षणाच्या प्रारंभी तज्ज्ञ मार्गदर्शक संदेश गमरे यांनी विद्यार्थ्यांना एआय म्हणजे काय, त्याचे विविध क्षेत्रांतील उपयोग, शिक्षणातील एआयचा वापर, माहितीचे संकलन, लेखन, सर्जनशीलता, समस्या सोडविणे तसेच दैनंदिन जीवनातील तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर याबाबत मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध एआय साधनांचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याने त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढला असून, अनेक विद्यार्थ्यांनी एआयच्या माध्यमातून नवीन गोष्टी शिकण्याची इच्छा व्यक्त केली.

## संगणक दालनाचे उद्घाटन

**। म्हसळा । प्रतिनिधी।**

स्पर्धात्मक युगात आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञान शिकता येणे अत्यावश्यक आहे. तर स्पर्धेच्या युगात टिकून राहता आले पाहिजे, असे प्रतिपादन पी.एम.श्री. प्राथमिक शाळा म्हसळा नं.१ येथील संगणक दालनाचे उद्घाटनाप्रसंगी सभापती बबन मनवे यांनी केले. जिल्हास्तर खनिजकर्म योजना अंतर्गत ५६, आणि जि. प. सेस योजना अंतर्गत ५६ असे एकूण १२२ इंग्रजी लॅब रायगड जिल्ह्यासाठी मंजूर झाल्या असून म्हसळा तालुक्यासाठी एकूण ७ लॅब मिळाल्या आहेत. त्यामध्ये पाभरे मराठी, संदेरी उर्दू, पी.एम.श्री. मराठी शाळा नं.१, मेंदडी कोंड, तुरुंबाडी, साळवीन्डे, खारगाव खुर्द या ७ शाळांचा समावेश आह. पाभरे मराठी संगणक लॅबचे उद्घाटन जि.प. सदस्य अनिल बसवत, संदेरी उर्दूचे उद्घाटन जि.प. सदस्य अभिषेक विचारे, पी.एम.श्री. मराठी शाळाचे उद्घाटन सभापती बबन मनवे, मेंदडी व तुरुंबाडीचे उद्घाटन उपसभापती लहुशेठ म्हात्रे, साळवीन्डेचे उद्घाटन पं.स. सदस्य समृद्धी चाचले तर खारगाव खुर्दचे उद्घाटन पं.स. सदस्य प्रियांका निंबरे यांच्या हस्ते करण्यात आले.

**विमानतळ मार्ग होणार अधिक सुरक्षित | वाहतूक व्यवस्थेवर राहणार प्रभावी नियंत्रण**

# कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी परिसरात 'सीसीटीव्हीची' नजर

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

पनवेल येथील कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी परिसरातून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या महत्त्वाच्या मार्गावर आता 'सीसीटीव्हीची' नजर राहणार आहे. या रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसह नागरिकांना अधिक सुरक्षित प्रवासाची सुविधा मिळण्यास मदत होणार आहे.



विमानतळाच्या दिशेने जाणारा हा मार्ग दिवसेंदिवस अधिक महत्त्वाचा ठरत आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा उपयुक्त ठरणार आहे.

कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीच्या बाजूलाच पनवेल महानगरपालिकेच्या नवीन मुख्य प्रशासकीय इमारतीचे कामही अंतिम टप्प्यात आले आहे. महापालिकेची नवीन इमारत पूर्णत्वाकडे येत असल्याने या परिसरातील वर्दळ आगामी काळात आणखी वाढण्याची शक्यता आहे. याच मार्गावरील पुलावरून पुढे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणारा रस्ता उपलब्ध आहे. तर दुसऱ्या दिशेने कळंबोली आणि जेएनपीटीकडे जाणारा महत्त्वाचा मार्ग जोडला जातो. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, एनएच-४ तसेच जेएनपीटीकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी हा परिसर एक महत्त्वाचा दुवा ठरत आहे. वाढती वाहतूक लक्षात घेता सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे वाहनांच्या हालचालींवर सातत्याने लक्ष ठेवणे शक्य होणार आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यासही यामुळे मदत होण्याची अपेक्षा आहे. तसेच, अपघात अथवा वाहतुकीची समस्या उद्भवल्यास सीसीटीव्ही फुटेज महत्त्वपूर्ण पुरावा म्हणून उपयोगी ठरणार आहे.

### सुरक्षाव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल

विमानतळ सुरू झाल्यानंतर या मार्गावरील वाहतुकीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रस्त्यावरील सुरक्षाव्यवस्था अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे. नवीन महापालिका मुख्यालय, विमानतळ मार्ग आणि विविध महामार्ग यामुळे कर्नाळा परिसराचे महत्त्व अधिक वाढत आहे. या पार्श्वभूमीवर सीसीटीव्ही यंत्रणा लवकरात लवकर पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. तसेच कॅमेऱ्यांची नियमित देखभाल आणि नियंत्रण कक्षातून प्रभावी देखरेख करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## निवडक



### वाघोली येथे बसस्थानकाचा शुभारंभ

**खारेपाट** : अलिबाग तालुक्यातील कामार्ले ग्रामपंचायत हद्दीतील वाघोली येथे बस स्थानकाचा शुभारंभ कामार्ले ग्रामपंचायत सरपंच अजिता राजेंद्र गावंड गजने यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी उपसरपंच प्रगती सुभाष शिगरुत, ग्रामपंचायत सदस्य, आशा सेविका, ग्रामस्थ उपस्थित होते. या पंचक्रोशीतील प्रवासी वर्ग व शाळा कॉलेजमधील विद्यार्थी ज्येष्ठ नागरिकांना ऊन्हाळ्यात व पावसाळ्यात बसता यावे याकरिता सोनल ग्रुप व गजने ग्रुप त्यांच्या माध्यमातून बसस्थानकाची निर्मिती करण्यात आली. या सामाजिक उपक्रमाबद्दल सामाजिक कार्यकर्ते नंदकुमार पाटील यांनी ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य तसेच सोनल ग्रुप व गजने ग्रुप तसेच सामाजिक कार्यकर्त कैलास गजने सुरेश गजने यांचे अभिनंदन केले. यावेळी अरुण पाडगे, राजेंद्र वालेकर, चंद्रकांत वालेकर, दिगंबर गिरी, दीपक गोंधळी, आशिष वालेकर, प्रणय पवार, नरेश पाटील, निलेश शिंगरूत व पंचक्रोशीतील मान्यवर मंडळी व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



### रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नेरळ** : नेरळ व्यापारी फेडरेशन यांच्या वतीने नेरळमध्ये रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या सामाजिक उपक्रमाला स्थानिक तरुण आणि व्यापाऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ३८ रक्तदात्यांनी रक्तदान करून आपले सामाजिक दायित्व पार पाडले. या शिबिरात रायगड हॉस्पिटल ब्लड बँक यांच्या वैद्यकीय टीमने संकलन करण्याचे कार्य केले. रायगड हॉस्पिटलच्या डॉ. प्रीती आणि आरोग्य पथकाने रक्त संक्रमण करण्यात आले. समाजातील गरजू रुग्णांना रक्ताचा तुटवडा भासू नये, या उदात्त उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी विविध क्षेत्रांतील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.



### मुंबईकर पर्यावरणप्रेमींकडून वृक्षारोपण

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील भिवपुरी रोड येथील पाली भुतिवली धरण परिसरात वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात परिसरातील रहिवासी आणि पर्यावरणप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग घेत सुमारे ५० रोपांची लागवड केली. पाली भूतीवली लघुपाटबंधारे प्रकल्प परिसरातील निसर्गसौंदर्य आणि जैवविविधता टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पावसाळ्यातील अनुकूल वातावरणाचा फायदा घेत विविध रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी सहभागी झालेल्यांनी रोपांची योग्य निगा राखण्याचा संकल्पही केला. विलास वैद्य, ममता वैद्य, धनश्री वैद्य, समीर जोशी, हेमंत पाठक, अमृता पाठक, विजय रायकर, सारंग मुळे, मनीष विश्वकर्मा, नयना आघारकर, अश्विनी कारंडे, नम्रता विश्वकर्मा, कृपाली पांड्या अर्पिता खानविलकर, गंधार खानविलकर, सुरेश देवकर, निखिल गायकर, रवी जाधव यांनी पाली भुतिवली धरण परिसरात वृक्षारोपण केले. या उपक्रमाचे पर्यावरणप्रेमी आणि स्थानिकांकडून कौतुक होत आहे.

### कामगार कायद्याविषयी प्रशिक्षण शिबीर




**चणेर** : जनरल मजदूर सभा, ठाणे यांच्या वतीने रोहा औद्योगिक वसाहतीतील कायमस्वरूपी, कंत्राटी व हंगामी कामगार तसेच एक्झिक्युटिव्ह आणि ऑफिसर्ससाठी कामगार कायद्यावरील प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. आर.व्ही. फार्म, हेमंत कांबळे यांच्या फार्म हाऊस येथे हे शिबीर पार पडले. या शिबिरात कामगार कायदे, कामगारांचे हक्क, वेतन, कामाचे तास, ओव्हरटाईम, कंत्राटी कामगारांचे अधिकार, सामाजिक सुरक्षा, पीएफ, ईएसआय, ग्रॅच्युइटी तसेच कामगार संघटनांचे अधिकार या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कामगार नेते संजय वढावकर यांनी कामगार कायद्यांचा सखोल अभ्यासपूर्ण आढावा घेत, विविध कायदेशीर तरतुदी कामगारांना सोप्या व सरळ भाषेत समजावून सांगितल्या. तर नवीन कामगार कायद्यांमुळे कामगारांवर होणारे संभाव्य परिणाम समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तर ॲड. अनिरुद्ध कोयंदे यांनी स्टँडिंग ऑर्डर्स, जुने व नवीन कामगार कायदे आणि त्यातून कामगारांसमोर निर्माण होणाऱ्या कायदेशीर अडचणी याबाबत मार्गदर्शन केले.

### सावतामाळी पतसंस्थेची वार्षिक सभा

**अलिबाग** : नामांकित सावतामाळी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा क्षात्रैक्य समाज हॉल कुरूळ येथे नुकतीच पार पडली. सभा सुरु होण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे येथील सहकार खात्यातील प्राध्यापक वटाणे यांनी उपस्थित सभासदांना बहुमोल मार्गदर्शन केले. तसेच सहकार कायदयातील समाविष्ट झालेल्या नविन तरतुदीबद्दल माहिती दिली. सभासदांना त्यांचे अधिकार व कर्तव्य यांची जाणीव करुन दिली. यावेळी माजी संचालिका भावेश्री वाळंज यांना कोकण विभाग आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सन्मानचिन्ह देऊन संस्थेमार्फत सन्मान करण्यात आला. तसेच संस्थेने या आर्थिक वर्षात गाठलेल्या १०० कोटी ठेव संकलनात विशेष यागदान देणारे संस्थेचे स्वल्पबचत प्रतिनीधी लक्ष्मण साखरकर, आकाश पाटील, दिनेश थळे यांचा संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वर्षात पतसंस्थेने १०० कोटींचा ठेवींचा टप्पा पार केल्याबद्दल संस्थेने एक चित्रफित दाखवली. त्यामध्ये संस्थेने स्थापनेपासून आजपर्यंत कशी प्रगती केली आणि कशी मेहनत घेऊन सभासदांचा विश्वास संपादन केला. त्याबद्दल सविस्तर माहिती दिली. यावर्षी सुध्दा संस्थेने सभासदांना ११ टक्के लाभांश जाहीर केला. यावेळी सर्व सभासदांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. सभेला सर्व संचालक, कर्मचारी वर्ग तसेच सभासद वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# श्रीवर्धन झेप ‘ब्लू फ्लॅग’च्या दिशेने

## || पर्यावरणपूरक पर्यटनाला मिळणार चालना || आकर्षक माहिती फलकांद्वारे निसर्ग साक्षरता

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

नयनरम्य समुद्रकिनारा आणि समृद्ध निसर्गसंपदा लाभलेल्या श्रीवर्धनच्या सौंदर्यात आता ‘वन पर्यटन प्रकल्पा’मुळे मोलाची भर पडणार आहे. या प्रकल्पामुळे केवळ पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना मिळणार नसून, निसर्ग आणि जैवविविधतेबाबत पर्यटकांमध्ये जनजागृती घडवून आणणे शक्य होणार आहे.



या पर्यटन प्रकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे सूर्यनमस्काराचे महत्त्व पटवून देणारे सुंदर पुतळे या ठिकाणी उभारण्यात आले आहेत. आरोग्य आणि निसर्गाचा मिलाफ साधणारा हा उपक्रम पर्यटकांचे मुख्य आकर्षण ठरेल. तसेच पर्यटकांना निसर्गाच्या अधिक जवळ नेण्यासाठी विविध जंगली प्राणी आणि जलचर प्राण्यांच्या हुबेहूब व आकर्षक प्रतिकृती या परिसरात उभारण्यात आल्या आहेत.

आकर्षक माहिती फलकांद्वारे निसर्ग साक्षरता पर्यटकांमध्ये निसर्ग आणि जैवविविधतेबद्दल साक्षरता निर्माण व्हावी यासाठी परिसरात विशेष माहिती फलक लावण्यात आले आहेत. यामध्ये जलचर प्राणी, जंगली प्राणी, दुर्मिळ फुलपाखरे आणि जंगलातील दुर्मिळ फुले यांची रंजक व सविस्तर माहिती देणारे आकर्षक फलक लावण्यात आले आहेत.

याशिवाय, श्रीवर्धन तालुक्यात गिधाडांसारखे दुर्मिळ होत चाललेले पक्षी आणि त्यांची घटती संख्या हा चिंतेचा विषय ठरत आहे. या पार्श्वभूमीवर, तालुक्यातील दुर्मिळ गिधाडे, धनेश, समुद्री घार यांसारख्या विविध जातींच्या पक्ष्यांची सविस्तर माहिती देणारे फलकही येथे लावण्यात आले आहेत. यामुळे पक्षी निरीक्षण आणि संवर्धनाला मोठा वाव मिळेल.

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याला मिळालेले ‘ब्लू फ्लॅग बीच’ हे मानांकन कायमस्वरूपी मिळवण्यासाठी वनविभागाच्या जागेवर स्वच्छता, सौंदर्यीकरण आणि सुरक्षेच्या दृष्टीने हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

> समुद्रकिनाऱ्याचे सौंदर्यीकरण आणि स्वच्छता राखून श्रीवर्धनला कायमस्वरूपी ‘ब्लू फ्लॅग’ मानांकन मिळवून देणे हे आमचे ध्येय आहे. सुरूची झाडे ही किनाऱ्याचे वादळांपासून रक्षण करणारे नैसर्गिक कवच आहेत, त्यांचे संरक्षण या प्रकल्पाद्वारे होईल. त्याचसोबत ऑलिव्ह रिडले कासव आणि दुर्मिळ गिधाडांसारख्या घटकांची माहिती देऊन. या प्रकल्पाचा थेट फायदा स्थानिक तरुणांना रोजगाराच्या रूपात होणार आहे.
> – स्वप्नील चंबुले
> वनपरिक्षेत्र अधिकारी, श्रीवर्धन

## निवडक

### संपत जैन यांच्याकडून गणवेशांचे वाटप



**आगरदांडा :** स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मुरुड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या नांदगाव मराठी शाळा नं. १ मधील विद्यार्थ्यांना नांदगावचे रहिवासी संपत जैन व त्यांचे पुत्र रमेश जैन यांनी स्वखर्चाने शारीरिक शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या खास गणवेशाचे वाटप त्यांच्याच हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास नांदगावच्या सरपंच सेजलत घुमकर, मेघा मापगावकर, माजी मुख्याध्यापक गजानन मुंबईकर, ग्रामपंचायत अधिकारी प्रमोद म्हात्रे, ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्षा वृषाली विनोद जोशी, ग्रामपंचायत सदस्य विक्रांत कुबल, जितेंद्र दिवेकर, मुख्याध्यापक हेमंत नांदगावकर, पदवीधर शिक्षक अश्विन राठोड, नितेश राऊत, सिध्दि ठाकुर, ग्रामस्थ, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक नांदगावकर यांनी जैन पिता पुत्र तसेच कार्यक्रमाला उपस्थित असलेल्यांचे आभार व्यक्त केले.



### राज ठाकरेंकडून मुलींच्या धाडसाचे कौतुक

**कर्जत :** कोंदिवडे येथील शाळकरी मुलींनी गावातील खराब रस्त्यांची दयनीय अवस्था आपल्या अनोख्या आणि उपरोधिक शैलीत मांडणारा व्हिडीओ तयार केला होता. हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून, त्यांच्या धाडसी आणि निर्भीड भूमिकेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या व्हिडीओची दखल घेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी या मुलींची भेट घेत नेहा घारे, ज्योत्स्ना मुकणे, मानसी पवार या मुलींशी संवाद साधत त्यांच्या धाडसाचे, सामाजिक प्रश्न मांडण्याच्या पद्धतीचे आणि जनतेच्या समस्यांकडे लक्ष वेधण्याच्या प्रयत्नाचे कौतुक केले. तसेच सर्व मुलींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी प्रसन्न बनसोडे, जितेंद्र पाटील, भूषण राणे, सुयश महागावकर कर्जत यांच्यासह मनसेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गोडबोले दाम्पत्याचा सन्मान

माणगाव : स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्रातर्फे पद्मश्री डॉ. राम गोडबोले व पद्मश्री सुनीता गोडबोले या दाम्पत्याचा माणगाव येथील वनवासी कल्याण आश्रमशाळेत सन्मान करण्यात आला. आदिवासी समाजाच्या आरोग्यसेवेसाठी गोडबोले दाम्पत्याने केलेल्या प्रदीर्घ व उल्लेखनीय कार्याची दखल घेत भारत



सरकारने त्यांना २०२६ चा पद्मश्री पुरस्कार प्रदान केला. या गौरवाचे औचित्य साधून सत्कार व सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वनवासी कल्याण आश्रम कोकण प्रांताचे अध्यक्ष विष्णूजी सुरूम व उपाध्यक्ष मधुकर गावित यांच्या हस्ते गोडबोले दाम्पत्याचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी शिवराज भागवत, दत्तोपंत साळुंखे, वनवासी कल्याण आश्रम रायगड जिल्हा सचिव मनोज कामत, उपाध्यक्ष रवींद्र बोरसे, सहसचिव नितीन चांदोरकर, सुभाष अधिकारी, प्रशांतजी ढेपे, राजेश माटे, श्री व सौ. कोपरकर (पुणे), अमेय भावे, भिवा पवार, मुख्याध्यापक उत्तम पाटील, अरुण पाटील, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि माणगाव शहरातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- पाटील अँड शेख अकॅडमी SSC, HSC, BA, B.COM, B.SC. उत्तीर्ण आणि अनुत्तीर्ण गृहीणींसाठी, मुलींसाठी, मुलांसाठी सुवर्णसंधी आमच्या टेक्निकल कोर्ससाठी प्रवेश घ्या, उत्तम पगार मिळवून यशस्वी व्हा. सिव्हिल/आर्किटेक्चरल ड्राफ्टसमनची आणि मेकॅनिकल ड्राफ्टसमनची नविन बॅच ११ऑगस्ट २०२६ पासुन सकाळी आणि संध्याकाळी सुरु होणार आहे. प्रवेश सुरू झाले ९७५७०९९९२३
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, वेटर, हाऊसकिपर, इंडियन चायनीज कुक, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- डिलेव्हरीसाठी माणसे पाहिजेत. फक्त अलिबाग परिसरातील गरजुनी १)पोयनाड, वडखळ, पेण, २) रेवदंडा मुरुड, श्रीवर्धन, ३) बाईक आमची लायसन्स पाहिजे. ४) कॉम्प्युटर ऑपरेटर सकाळी ९-०० ते १.०० व दुपारी ३.०० ते ७.०० ५) पार्ट/फुल टाईम चालेल. मो.नं. ८८८८२२०२२१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेला प्रतिसाद

**| कर्जत | प्रतिनिधी |**

९ ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त क. ता. वि. प्र. मंडळाचे स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रेय पांडुरंग डोंबे विद्यानिकेतन आणि रोटरी क्लब ऑफ कर्जत यांच्यासंयुक्त विद्यमाने आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तीन गटांत झालेल्या या स्पर्धेत १० शाळांमधील ५३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन शालेय समितीचे अध्यक्ष माधव भडसावळे यांच्या हस्ते झाले.



गट क्रमांक एकमध्ये ‘अवंतिकाबाई गोखले’ या विषयावर वक्तृत्व स्पर्धा झाली. यामध्ये विद्या विकास मंदिर, नेरळचा स्वराज ढमाल याने प्रथम क्रमांक पटकावला तर श्रुती शेळके हिने द्वितीय, गीता इंग्लिश मीडियम स्कूल, खांडपेची श्रुती कुंभार हिने तृतीय क्रमांक मिळवला. गट क्रमांक दोनचा विषय ‘अंतराळ क्षेत्रातील क्रांती’ हा होता. यामध्ये स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रेय पांडुरंग डोंबे विद्यानिकेतनच्या सायली पाटील हिने प्रथम क्रमांक मिळवला. सुंदर इंग्लिश मीडियम स्कूल, पोसरीच्या स्वराली गायकवाड हिने द्वितीय, तर विद्या विकास मंदिर, नेरळच्या प्रांजल कारुळकर हिने तृतीय क्रमांक पटकावला. गट क्रमांक तीनमध्ये ‘हरितक्रांती–पर्यावरण संरक्षण काळाची गरज’ या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. शारदा मंदिर इंग्लिश मीडियम स्कूलच्या अदिती शिंदे हिने प्रथम क्रमांक मिळवला. अभिनव ज्ञान मंदिर प्रशाला, कर्जतच्या तन्मयी शेठ हिने द्वितीय, तर याच शाळेच्या साहिल शिनारे याने तृतीय क्रमांक पटकावला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मीरा कडू यांनी केले. याप्रसंगी नितीन आहिर, दिपचंद जैन, रोहिणी जोशी, समीर डोंबे, सतीश श्रीखंडे तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## एआयमुळे स्मार्ट लर्निंगला नवी दिशा

**| तळा | प्रतिनिधी |**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, रायगड येथील आय क्यू ए सी व नॉलेज रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त मुबई विद्यापीठ पुस्तक पेढी अंतर्गत महाविद्यालय विद्यार्थासाठी स्पर्धा परीक्षा विषयी पुस्तकांचे ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रसंगी प्राध्यापक,प्रध्यापकेतर कर्मचारी आणि विधार्थी यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता. कार्यशाळेत डॉ. विश्वास हासे यांनी Google Drive AmpU -rtificial Intelligence या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा शैक्षणिक क्षेत्रात प्रभावीपणे कसा वापर करता येतो याबाबत मार्गदर्शन केले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत अन्वी तालुक्यात प्रथम

**| खोपोली | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी प्राथमिकशिष्यवृत्तीपरीक्षेतखालापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. सर्वसाधारण ग्रामीण प्रवर्गात रिलायन्स फाऊंडेशन स्कूल, लोधीवली येथील अन्वी मुरकुटे हिने ७८.६६ टक्के गुण मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला.



तालुकानिहाय गुणवत्ता यादीत रिलायन्स फाऊंडेशन स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे सर्वसाधारण ग्रामीण प्रवर्गातील गुणवत्ता यादीतील पहिल्या पाच क्रमांकांपैकी चार क्रमांक या शाळेच्या विद्यार्थ्यांनी मिळविले आहेत. गुणवत्ता यादीत अन्वी मुरकुटे प्रथम, प्राथमिक विद्यामंदिर चौकची केतकी जिवाजी कातोरे हिने ७७.३३ गुणांसह द्वितीय, तर रिलायन्स फाऊंडेशन स्कूलच्या ऋचा संदीप सानप हिने ७३.३३ गुणांसह तृतीय, देवांश चंद्रकांत तांदळे याने ६८ गुणांसह चतुर्थ आणि शुभ्रा वैभव बेडेकर हिने ६२ गुणांसह पाचवा क्रमांक मिळविला आहे.

दरम्यान, प्राथमिक विद्यामंदिर, चौकच्या काव्या गडगे हिने राष्ट्रीय ग्रामीण प्रवर्गात तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत शाळेच्या यशात भर घातली. गुणवंत विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक आणि शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छाही देण्यात आल्या.

## ठाणा नाका रस्त्याची दुरवस्था

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी|**

पनवेल महानगरपालिकेची विशेष अर्थसंकल्पीय सभा शुक्रवारी उत्साहात पार पडली. शहराच्या विकासासाठी विविध योजनांची घोषणा करण्यात आली. मात्र, त्याच दिवशी शहराच्या मध्यवर्ती ठाणा नाका येथील आदिवासी पाड्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील मोठमोठे खड्डे विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या मार्गावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले असून, मुसळधार पावसामुळे त्यामध्ये पाणी साचत आहे. पादचारी, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि स्थानिक रहिवाशांना रोजच या रस्त्यावरून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, या परिसरातच पनवेल महानगरपालिकेचे महापौर तसेच अनेक लोकप्रतिनिधींची निवासस्थाने असूनही रस्त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

## महानगरपालिकेच्या मुख्यालयात प्रवेशासाठी कसरत

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी|**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीतील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या एक खिडकी विभागाच्या प्रवेशद्वारासमोरच चारचाकी व दुचाकी वाहने अनधिकृतपणे पार्क केली जात असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विविध दाखले, परवानग्या, आदी कामांसाठी दररोज शेकडो नागरिक या विभागात येत असतात. मात्र, प्रवेशद्वारासमोर



वाहनांचा गराडा असल्याने नागरिकांना अक्षरशः वाट काढत कार्यालयात प्रवेश करावा लागत आहे.

ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग व्यक्तींना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. महापालिकेच्या मुख्य कार्यालयातच अशी परिस्थिती असताना प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. प्रवेशद्वारासमोर स्पष्ट नो पार्किंग फलक, तसेच नियमित सुरक्षा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी होत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेल्या ‘एक खिडकी’ व्यवस्थेच्या प्रवेशद्वारासमोरच अनधिकृत पार्किंगचा अडथळा निर्माण होत असल्याने पालिका प्रशासनाने तातडीने लक्ष घालून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## वाजेकर महाविद्यालयात एड्स जनजागृती

**चिरनेर :** रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालय फुंडे, उरणच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व जिल्हा एड्स प्रतिबंध, नियंत्रण विभाग व जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग, यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमध्ये एड्स या आजाराबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये एड्स आजाराबाबत जनजागृती करणे या आजाराला प्रतिबंध घालणे, त्याचबरोबर अमली पदार्थातून होणारे संक्रमण रोखणे हे आहेत. याप्रसंगी इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाच्या तृप्ती परजने, प्रा. पवार, विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## श्रीवर्धनमध्ये मच्छीची आवक वाढली

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

मागील दहा ते पंधरा दिवसांपासून श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याच्या जवळच लहान होड्यांमधून मच्छिमारांनी मच्छिमार सुरू केली आहे. समुद्राचे पाणी थोडे शांत झाल्यामुळे सध्या मच्छिमारी करण्यासाठी चांगली वेळ आहे. खोल समुद्रात मच्छिमारी करण्यासाठीची बंदी १५ ऑगस्ट रोजी उठली असली तरीही, नारळी पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला नारळ अर्पण केल्यानंतरच मच्छिमार बांधव खोल समुद्रातील मच्छिमारी चालू करतील. सध्या समुद्रकिनाऱ्याच्या जवळच मुबलक प्रमाणात मच्छी सापडत आहे.

यामध्ये खास करून कोळंबी, बोंबील, ढोमा, मांदेली आदी मच्छी बाजारामध्ये मुबलक प्रमाणात उपलब्ध होत आहे. मच्छीची आवक



वाढलेली तरीही मच्छीचे भाव गगनाला भिडलेले आहेत. ९०० ते ८०० रुपये किलो असलेले पापलेट या वेळेला बाराशे रुपये किलोनी विकले जात आहे. तर तीनशे ते साडेतीनशे रुपयांना मिळणारी कोळंबी ही ४००, ४५० व ५०० च्या भावानी विकली जात आहे.

## बोरघर हवेली शाळेत लॅबचे उद्घाटन

**| तळा | प्रतिनिधी |**

तळा तालुक्यातील राजिप शाळा बोरघर हवेली येथे स्वातंत्र्य दिनानिमित्ताने इंग्लिश लॅबचे उद्घाटन तळा पंचायत समितीचे उपसभापती रविंद्र मांडवकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

याप्रसंगी उपसभापती रवींद्र मांडवकर यांनी सांगितले की, मराठी शाळा या इंग्रजी माध्यमाच्या शाळांबरोबर टिकल्या पाहिजेत, या शाळेतील विद्यार्थीही गुणवत्ता पूर्ण झाले पाहिजेत यासाठी शिक्षकांनी परिश्रम घ्यावेत. शाळेच्या काही समस्या असतील तर आम्ही त्या नक्कीच सोडवू परंतु, आदिवासी विद्यार्थ्यांना सुद्धा गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळून त्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करूया असे



आवाहन केले.

याप्रसंगी नानासाहेब भौड, परशुराम वरंडे, विलास कदम, गटविकास अधिकारी गायकवाड, रघुनाथ पोवार, ग्रामसेवक खैरे, लक्ष्मण शेलार, आत्माराम शेलार, दामू चव्हाण, श्वेता चव्हाण, गणपत लोंढे, रुक्मिणी जाधव, सलोनी नाकते, परशुराम वरंडे, विलास कदम, गटविकास अधिकारी गायकवाड यांचे समयोचित मनोगत झाले. प्रास्ताविक नथुराम मुंडे यांनी केले तर सूत्रसंचालन हेमंत बारटक्के यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी साक्षी बारटक्के, सपना बेंबळगे, प्रकाश ढाकणे, शाळा व्यवस्थापन समिती यांनी परिश्रम घेतले.

### पीएनपी कनिष्ठ महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम | पुस्तकांमध्ये वाचलेल्या इतिहासाचे प्रत्यक्ष दर्शन

## ‘काळाच्या पडद्याआडचे वैभव’ प्रदर्शन उत्साहात

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून पीएनपी कनिष्ठ महाविद्यालयाच्या इतिहास व भूगोल विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी ‘काळाच्या पडद्याआडचे वैभव’ या शीर्षकांतर्गत पुरातन नाणी व जुन्या ऐतिहासिक वस्तूंच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांना आपल्या समृद्ध ऐतिहासिक वारशाची ओळख व्हावी, इतिहास व भूगोल विषयांविषयी कुतूहल निर्माण व्हावे तसेच ऐतिहासिक वस्तूंच्या जतनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. भूगोल विभागाचे प्रा. आशिष




● (छायाचित्रः अमोल नाईक)

> **अभिनव उपक्रम**
> इतिहास व भूगोल विभागाच्या या अभिनव उपक्रमाचे महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी आणि उपस्थित मान्यवरांकडून कौतुक करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित केलेल्या या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान, देशप्रेम आणि आपल्या सांस्कृतिक वारशाबद्दल जतनाची भावना निर्माण झाली.

पाटील व प्रा. दिनेश पाटील यांनी या उपक्रमासाठी नाणी व विविध ऐतिहासिक वस्तूंचे संकलन केले तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील सुरज शेषनात शर्मा, नंदिनी कल्याण जुईकर, राज संजीत म्हात्रे, वेदिका योगेश पाटील, परी प्रमोद टेंगळे, प्रियंका मनोज खिल्लारे या विद्यार्थ्यांनी हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष प्रयत्न करून प्रदर्शनामध्ये विविध कालखंडातील पुरातन नाणी, जुन्या ऐतिहासिक वस्तू तसेच तत्कालीन जीवनशैलीशी संबंधित वस्तू संकलित केल्या.

पुस्तकांमध्ये वाचलेला इतिहास प्रत्यक्ष वस्तूंच्या माध्यमातून अनुभवण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास अभ्यासक, संगीतकार, लेखक मनीष अनसुलकर कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रवींद्र पाटील, उपप्राचार्य निशिकांत कोळसे, तेजस म्हात्रे, प्रा. मिनाज रोगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली तसेच कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे यांचे सहकार्य लाभले.

यावेळी मान्यवरांनी प्रदर्शनाची पाहणी करून इतिहास व सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच नाणेशास्त्राबद्दल ओघवत्या शब्दात विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

विद्यार्थ्यांनी प्रदर्शनातील विविध वस्तूंची माहिती जाणून घेत इतिहासातील घटनांकडे आणि तत्कालीन समाजजीवनाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न केला. ‘काळाच्या पडद्याआडचे वैभव’ या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना इतिहास हा केवळ पाठ्यपुस्तकातील विषय नसून, आपल्या वर्तमानाला समजून घेण्यासाठी आणि भविष्य घडविण्यासाठी मार्गदर्शक ठरणारा मौल्यवान वारसा आहे, याची जाणीव झाली.



# पनवेल-कर्जत रेल्वेमार्गाला वेग

**खांदा कॉलनी :** पनवेल-कर्जत रेल्वे मार्गावरील कामांना आता वेग आला असून, या मार्गावर लवकर प्रवासी रेल्वे सेवा सुरू होण्याचे संकेत मिळत आहेत. पनवेल रेल्वे स्थानकात कर्जत दिशेने धावणाऱ्या रेल्वेगाड्यांसाठी स्वतंत्र प्लॅटफॉर्म उभारण्याचे काम जोरदार सुरू आहे. त्यामुळे बहुप्रतीक्षित पनवेल-कर्जत रेल्वे सेवेच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

पनवेल स्थानक परिसरात नव्या प्लॅटफॉर्मचे काम अंतिम टप्प्यात आले असून, प्रवाशांच्या सुविधांसाठी आवश्यक पायाभूत सुविधाही उभारल्या जात आहेत. नव्या पुलाचे काम जवळपास पूर्ण झाले असून, त्यावर शेड उभारण्याचे काम सुरू आहे. प्रवाशांना स्थानकात ये-जा करताना सुविधा मिळावी यासाठी स्वयंचलित जिने बसविण्याचे कामही सुरू झाले आहे. पनवेल-कर्जत रेल्वे मार्गामुळे पनवेल, कर्जत तसेच आसपासच्या ग्रामीण आणि शहरी भागातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या या परिसरातील प्रवाशांना विविध मार्गांचा वापर करून प्रवास करावा लागत असल्याने नवीन रेल्वे सेवेची मोठी प्रतीक्षा आहे. ही सेवा सुरू झाल्यानंतर पनवेल–कर्जत प्रवास अधिक सुलभ होण्याबरोबरच या भागातील दळणवळणाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे कामे वेळेत पूर्ण करून रेल्वे सेवा लवकर सुरू करावी, अशी प्रवाशांची मागणी आहे.

# दिपक चिवेलकर पुरस्काराने सन्मानित

**उरण :** सामाजिक कार्यकर्ते म्हणून जनमानसात ओळखल्या जाणाऱ्या दिपक चिवेलकर यांनी गुहागर तालुक्यातील पांचाळ सुतार समाजाचा गौरव वाढविण्याचे काम केल्याने श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज आबलोलीच्यावतीने त्यांना समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. दिपक चिवेलकर यांनी रायगड जिल्ह्यातील उरणसह रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील गोर गरीबांच्या उद्धारासाठी अनेक सामाजिक उपक्रम राबविले, तसेच महिलांना एकत्र आणून त्यांच्यासाठी हळदीकुंकू समारंभ, गोर गरीब रुग्णांसाठी आरोग्य शिबिर राबविण्याचे काम हाती घेतले आहे. त्यांच्या या समाजाभिमुख कार्याची दखल गुहागर तालुक्यातील पांचाळ सुतार समाजांनी घेऊन दिपक चिवेलकर यांना श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज आबलोली गटाच्यावतीने समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींशी शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## ACEDEMY OF DEVELOPMENT SCIENCE
**At Post Kashele, Tal-Karjat, Dist- Raigad 410201**

जा.क्र.४७/२०२६-२०२७ दि. १८/०८/२०२६

**पवित्र पोर्टल प्रणालीद्वारे शिक्षक भरती**

अकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स संस्थेचे ज्ञानानुभव माध्यमिक विद्यालय कशेळे तालुका कर्जत जिल्हा रायगड. या शाळेत (१००% अनुदानित) ९ वी ते १० वी साठी पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पवित्र पोर्टल द्वारे अर्ज मागविण्यात येत आहे.

**पदाची माहिती**

| अ. क्र | जातीचा प्रवर्ग | अनुदानाचा प्रकार | शिकविण्याचे माध्यम | शैक्षणिक पात्रता | व्यावसायिक पात्रता | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वि.जा.(अ) | १००% अनुदानित | मराठी | Msc/Bsc | BEd | ०१ |

अधिक माहितीसाठी खालील संकेत स्थळाला भेट द्यावी.

https://tait2025mahateacharrecruitment.org.in

ठिकाण : ए.डी.एस. कशेळे
दिनांक १८.०८.२०२६

सही/-
**कार्याध्यक्ष**
**अकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स.**
**ज्ञानानुभव माध्यमिक विद्यालय. कशेळे**
**तालुका कर्जत जिल्हा रायगड. पिन ४१०१०१**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**रोजगार अधिसूचना क्र.सीओ/पी-आर/१३सी/२०२६ दिनांक १२.०८.२०२६**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (केआरसीएल) ने अभियांत्रिकी विभागातील विविध पदांसाठी एक वर्षाच्या प्रारंभिक कालावधीसाठी निश्चित मुदत कंत्राटी तत्त्वावर वॉक-इन इंटरव्यूद्वारे रोजगार अधिसूचना प्रकाशित केली आहे. तपशील खालीलप्रमाणे आहे:

| अ. क्र. | पदाचे नाव | यूआर | ई डब्ल्यू एस | ओबीसी | एस सी | एस टी | पदांची एकूण संख्या | वॉक-इन इंटरव्यू की तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ तकनीकी सहायक | २ | ० | ० | १ | ० | ३ | २५.०८.२०२६ |
| २ | कनिष्ठ तकनीकी सहायक / डिजाइन एवं ड्रॉइंग | ५ | ० | ० | ० | ० | ५ | |

उमेदवार केआरसीएलच्या संकेतस्थळावरील **www.konkanrailway.com** भरती --> वर्तमान अधिसूचना या लिंकअंतर्गत अधिसूचनेचा तपशील, पात्रता निकष इत्यादी पाहू शकतात आणि त्यानुसार अर्ज करू शकतात.

**मुख्य कार्मिक कार्यालय**

## E-TENDER NOTICE

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification

| Sr. No. | Tender No.EE/400kV R.S. (O&M) Dn/ NGTN/Tech/ | Description | Estimated cost | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-19/26-27/ Rfx No.7000040957 | AMC for various type of 400 kV,220 kV & 22 kV bay maintenance work required at various s/s under 400kV R.S (O&M) Div, Nagothane | Rs. Limited to 25 lakh | 02.09.2026 up to 23.59 hrs |

**EMD 1% of estimate cost i.e. Rs. 25,000/-** and Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (DY.EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in Note:** All eligible suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**

## नावात बदल

माझे पूर्वश्रमीचे नाव नूतन वसंत खाडे असे होते लग्नानंतरचे माझे नाव सौ. स्नेहा अर्जुन पेडणेकर असे आहे. तरी माझ्या नावात बदल झाला. असून मला सौ.स्नेहा अर्जुन पेडणेकर या नावाने ओळखण्यात यावे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे वरई तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या सामाईक मिळकतीचे मालक सुरेश हरिभाऊ पालकर यांचेकडून त्यांच्या मालकीचे क्षेत्र विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १० | १/अ | ०-४४-२० पैकी विकत देणार यांच्या अविभक्त मालकीचे विक्री क्षेत्र ०-२२-१० | ५-१० |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १९/०८/२०२६

**ॲड. समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं. ०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता.कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, राधाबाई रघुनाथ पवार,रा. तळदेव, शेडाशी, पो.रानसई, ता.पेण, जि.रायगड येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिनी शेडाशी कातकरीवाडी ता.पेण, जि.रायगड येथे असून मी. स्वतः आशुतोष किसनलाल बीयानी विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| शेडाशी कातकरीवाडी | राधाबाई रघुनाथ पवार | १८/३० | ०.०६.०० | ०.०४ |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वताः कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७(सात) दिवसाच्या आतमाझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक :१९/०८/२०२६

**आशुतोष किसनलाल बीयानी**
६०६ जीवन, विहार ५ मानव, मंदिर रोड, मलाबार हिल, मुंबई मलाबार हिल, महाराष्ट्र ४००००६
फोन नंबर ९००४६०००४६

## जाहीर नोटीस

या नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मौजे-वाजे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड, येथील सर्व्हे/हिस्सा क्रमांक-१३४/२, क्षेत्र सुमारे १-३९-५० हे. आर. पी., पैकी ०-४०-०० हे. आर. पी., क्षेत्राची जमीन (१) श्री गजानन सिताराम जळे (२) श्रीमती लता हरिश्चंद्र जळे (३) श्री निखिल हरिश्चंद्र जळे (४) श्री हार्दिक हरिश्चंद्र जळे (५) श्री अभिजीत हरिश्चंद्र जळे आणि (६) श्री गौरव हरिश्चंद्र जळे, यांच्या मालकीची असून, सदर जमीन मिळकतीबाबत आमचे अशिल हे मूळ मालक यांच्याबरोबर खरेदी - विक्रीचा व्यवहार करण्यास इच्छुक आहेत.

सदर वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतीवर जर कोणत्याही व्यक्तीचा विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट, जप्ती, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा असा हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रांनिशी पुराव्यासह लेखी हरकत माझ्या कार्यालयीन पत्ता-४०६, शेल्टन क्युबिक्स, भूखंड क्रमांक-८७, सेक्टर क्रमांक-१५, सी.बी.डी., बेलापुर, नवी मुंबई-४०० ६१४, या पत्त्यावर पाठवावी, जर १५ (पंधरा) दिवसांच्या आत कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर जमीन मिळकत ही पूर्णपणे निर्वेध आहे, असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल हे सदर जमीन मिळकतीबाबतचा खरेदी -विक्रीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**दिनांक : १९ ऑगस्ट २०२६**

**सही/-**
**श्री. सुनिल जे. गर्ग**
**वकील**

## जाहीर नोटीस

दिनांक १८/०८/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशीलांनी पाली नगरपंचायतीच्या हद्दीतील मौजे पाली ता. सुधागड जि. रायगड येथील सर्वे नंबर ५३/अ निवासी बिनशेती प्लॉट नंबर १३ वरील आशियाना कॉम्प्लेक्स नंबर दोन या इमारतीमधील पहील्या मजल्यावरील सदनिका क्रमांक १०४ कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - पाली ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | मिळकत क्रमांक | क्षेत्र चौ.मी.फुट |
|---|---|---|
| श्रीमती.ज्योती दिलीप चव्हाण | २४०३/१०४ | २९०-०० चौ फुट (बिल्टअप) |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहू मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार यांनी आपली योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशिलांशी सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कुणाचीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण- पाली-सुधागड
दिनांक : १८/०८/२०२६

सही /-
**श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर**
ॲडव्होकेट
मु.पो.नविन पनवेल ता.पनवेल जि.रायगड
मो.बा.नं.८१४९६५१५०८

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत खरेदी करण्याचे योजिले असल्याने, आम्ही आमच्या अशिलांच्या वतीने सदर मिळकतीसंदर्भात ("सदर मिळकत") (१) अहिल्या काशिनाथ भोईर, (२) हौशिराम जानू भोईर, (३) सुमन सुरेश पाटील, (४) किशोर तुळशिराम भोईर, (५) विनोद काशिनाथ भोईर, (६) यामिनी रमाकांत पाटील, (७) देविना जयदास गोंधळी, (८) अस्मिता अरुण कासकर, (९) परशुराम जानू भोईर, (१०) महादेव जानू भोईर, (११) निर्मला मोहन भोईर, (१२) अमर मोहन भोईर, (१३) नियंता मोहन भोईर, (१४) कल्पेश जगदिश भोईर, (१५) राजेश जगदिश भोईर, (१६) हौसाबाई नारायण पाटील, (१७) मनिषा वसंत भोईर, आणि (१८) दिप वसंत भोईर यांचे मालकी हक्क तपासत आहोत.

कोणत्याही व्यक्ती/संस्थेस सदर मिळकत किंवा त्यातील कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, भाडेकरी हक्क, अनुज्ञप्ती, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा व स्वरूपाचा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना संबंधित कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह क्वाड्रा लीगल (Quadra Legal), ॲडव्होकेट्स अँड सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे, या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत ही कोणत्याही दावा, मागणी अथवा हरकतीपासून मुक्त आहे असे गृहीत धरण्यात येईल, व मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अथवा हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

मौजे - जुई, तालुका - उरण, जिल्हा - रायगड येथे स्थित असलेल्या सर्वे क्र. १०२/१५ एकूण क्षेत्र ००-६८-३० (हे.आर.चौ.मी.) या क्षेत्रफळाच्या जमिनीपैकी वर नमूद अठरा (१८) मालकांच्या संयुक्त मालकीचा असलेला ००-३४-०० (हे.आर.चौ.मी.) क्षेत्रफळाचा अविभाजित हिस्सा असून, त्यापैकी ००-१६-०० (हे.आर.चौ.मी.) क्षेत्रफळाचा अविभाजित भाग असलेला तो सर्व हिस्सा व तुकडा.

ठिकाण: मुंबई
दिनांक : /०८/२०२६

**क्वाड्रा लीगल**
**ॲडव्होकेट्स ॲंड सॉलिसिटर्स करिता**
**सही/-**
**विक्रांत झुंजाराव**
Vikrant.z@quadralegal.in

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) हर्षदा दत्तात्रेय दळवी व २) अनिरूद्ध दत्तात्रेय दळवी यांचेकडून सुप्रिया राजेश पाटील यांचे संमतीने कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| किहीम | ३०१ | ०-६२-६० | ५.१८ |
| | | पो.ख. ०-०७-७० | |
| | | ०-७०-३० | |

**पैकी दक्षिण-पूर्व दिशेकडील ० हे. ४० आर एवढे क्षेत्र (सदर मिळकत).**

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेल्या कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १९/८/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/१,२, तळमजला, 'श्रुतीसारंग' को. ऑप.हा.सोसायटी, युनियन बँकेसमोर, ब्राह्मण आळी, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या सातबाऱ्यावर मालक व कब्जेदार म्हणून ही श्री. संदीप नामदेव म्हात्रे व श्रीमती मालती नामदेव म्हात्रे यांची नोंद आहे. सदर मिळकत निर्वेध व निर्जोखमी असून, मालकांच्या मालकी हक्काची व कब्जेउपभोगाची असल्याचे त्यांनी कथन केले आहे. सदर मिळकत खरेदीबाबत आमच्या अशिलांचा मालकांसोबत व्यवहार ठरला असून, मालकी हक्क तपासणीच्या अनुषंगाने ही नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**मिळकतीचे वर्णन :** जिल्हा व तुकडी रायगड, तालुका व पोटतुकडी पेण, मे. सह दुय्यम निबंधक साहेब पेण यांचे हद्दीतील येथील खालील वर्णनाची मिळकत :-

| गाव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| अंतोरे | ७१/अ/४६ | १०.५१.०० | १०५.१० |

वरील मिळकतीपैकी वरील मालकांच्या हिस्स्याचे क्षेत्र ६.७५.०० आर.चौ. मी., आकार ६७.५० रु.पैसे अशा वर्णनाची बिनशेती मिळकत, ही या जाहीर नोटीशीची विषय मिळकत असे.

सदर जमीन मिळकत ही तिच्या चतुःसीमा रेकॉर्ड ऑफ राईट्सप्रमाणे असून सदर मिळकतीवरील, खालील व मधील जल, दगड, माती, वस्तु, वृक्ष-झाडे, निधीनिक्षेप इत्यादींसह तसेच पायी व हलक्या-जड वाहनाने ये-जा करण्याचे वहिवाटीचे व इजमेंट हक्क आणि वर्तमान व भविष्यात प्राप्त होणारा संपूर्ण एफएसआय, उडता एफएसआय, व टीडीआर यांसह दरोबस्त आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, लीज, भाडेकरार, वाद, वहिवाट, पूर्वीचा करार, जाणे-येणेचा मार्ग, कोर्ट कचेरीचा वाद अथवा इतर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत कागदपत्रांसह आमच्या पत्त्यावर कागदपत्रांनिशी लेखी हरकत देऊन लेखी पोहोच घ्यावी. अन्यथा सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क, हितसंबंध अथवा बोजा नाही, असे समजून सदर मालकांच्या मालकी हक्काचा दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही.

दिनांक : १८/०८/२०२६

**ॲड. निषाद प्रकाश म्हात्रे**
पत्ताः१, श्री महालक्ष्मी वैभव, चिंचपाडा रोड, पेण, तालुका पेण, जिल्हा रायगड- ४०२१०७
मो. नं. ९६३७२६२५६९

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री माधव हरी जोशी यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे हेदवली, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १९/१०, यांचे एकुण क्षेत्र ०.३५.०० गुंठे, मिळकत विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : १९/०८/२०२६

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विदयमान जमिन मालक १. श्री. गजानन गोविंद धुळे, २. श्री.चिमा चंदर पवार, ३ श्रीम.अनिताबाई काशिनाथ लोभी, ४. श्रीम. कांताबाई यशवंत कारभारी, ५ श्रीम. वंदना मंगल तरे यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्श्यातील खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमिन आमचे अशिलानी त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे -

**मौजे तांबस, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| भूमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु. पै. |
|---|---|---|---|
| २९ | १ | ०.८२.७० ०.२०.०० गुंठे एवढे क्षेत्र | ०.७८ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने, कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे पोस्टाने पाठवाव्यात अथवा त्यांस संपर्क साधावा.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल.व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दिनांक : १९/०८/२०२६

**ॲड. शंकेश राजेश ठाकरे**
बी.एल.एस.एल.एल.बी.
पत्ता-गौरकामत, ता.कर्जत, जि.रायगड
मो. नं. ९२८४८९२३८७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्रीमती निर्मला हरिचंद्र पाटील रा.शिहू तालुका, जिल्हा-रायगड यांचेकडुन रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

मिळकतीचे वर्णन जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका पेण, तलाठी सजा-खारकोलेटी, मौजे-खारकोलेटी येथील स नं. ४०/३/१ क्षेत्र ०-५५-८० हे.आर. चौ.मी. त्यासी आकार रु. ६-१२ पैसे ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून २१(एकवीस) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-५५-८० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचीही कोणत्याही हक्क हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. १९/०८/२०२६.

सही/-
**ॲड.संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं.१६. तळमजला, शिवाजी पथ पेण-रायगड ४०२१०७
मोबा. ९८८१९१५२१९

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री माधव हरी जोशी यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे हेदवली, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २५/४ यांचे एकुण क्षेत्र १.३९.०० गुंठे, मिळकत विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : १९/०८/२०२६

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे आंबोली, तालुका-मुरुड, जिल्हा रायगड येथील व परिसरातील तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खालील परिशिष्ट अ यात वर्णन केलेल्या सदर मिळकतीची मालकी व वहीवाट ही परीशिष्ट अ मध्ये वर्णन केलेल्या मालकांची आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी व बोजारहीत असल्याचे हमी व खात्री विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेली असुन सदर मिळकतीचे खरेदीविक्री करण्याबाबत आमचे अशिलांबरोबर बोलणी केलेली आहे. तरी सदर परिशिष्ठ अ यात नमूद मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, उदा. गहाण, दान, लिज, बोजा, बक्षीस, विक्री, पोटगी, कुळखंड, ताबा, वहीवाट, इसारा, अदलाबदल, साठेखत, कुलमुखतयार भाडेकरार, वारसा, कुळ, भोग, जप्ती, अथवा अन्य कुठलाही प्रकारचा तबदीलीचा लेखी अथवा तोंडी करार असल्यास त्याने आमचे पुढील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांच्या आत योग्य त्या मूळ कागदपत्रानिशी प्रत्यक्ष भेटून तशी खात्री पटवून दयावी किंवा लेखी हरकत नोंदवावी अन्यया सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा तथाकथित हक्क व अधिकार नाही व सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, बोजाविरहीत आहेत असे गृहीत धरून व ज्या कोणाचा कसल्याही प्रकारचा तथाकथित हक्क व अधिकार असल्यास त्याने जाणिवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार विद्यमान मालकांसंबंधी पूर्ण करतील. मागावून कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार व हरकत चालणार नाही व ती सदर व्यवहारावर बंधनकारक नाही याची कृपया नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

**मिळकतीचे वर्णन-** जिल्हा व तुकडी रायगड पोट तुकडी व मे.दुय्यम निबंधक साहेब मुरुड, तालुका-मुरुड व पंचायत समिती मुरुड यांचे अखत्यारीतील मौजे आंबोली येथील जमीन मिळकत यांचे वर्णन खालीलप्रमाणे.

**परीशिष्ट-अ**

| गट नं | क्षेत्र | पोट खराबा | एकुण क्षेत्र | आकार | विद्यमान मालक |
|---|---|---|---|---|---|
| २४९ जुना सर्वे नंबर ९६/२ | हे २.१६.०० आर | हे ०.२७.०० आर | हे २.४३.०० आर | रू १.५१ पै | मुनाफ फकरुद्दीन खतीब, नौशाद फकरुद्दीन खतीब, गुलनाज फकरुद्दीन खतीब, शबाना फजल खतीब, कैस फजल खतीब, मनजा फजल खतीब. |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

**ॲड. वैशाली मोहन वदक,**
मु पो पार्ले, ता.कराड जि.सातारा
मोबा. ९७६३४४०१७५


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटिंग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटिक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



# एका युगाचा अंत होणार?

## ख्रिस्तियानो रोनाल्डो फुटबॉलमधून निवृत्ती घेणार

**नवी दिल्ली :** फुटबॉलच्या जगातील पाच वेळा बॅलोन डीफओर विजेता ख्रिस्तियानो रोनाल्डोने आपल्या निवृत्तीबद्दल सर्वात मोठा संकेत दिला आहे.

या पोर्तुगीज दिग्गज फुटबॉलपटूने म्हटले आहे की, चालू हंगाम हा एक खेळाडू म्हणून त्याचे शेवटचे वर्ष असू शकते. ४१ वर्षीय रोनाल्डोचा सध्या सौदी प्रो-लीग क्लबच्या अल नासरसोबत जून २०२७ पर्यंत करार आहे. जरी त्याने भूतकाळात अनेक वेळा आपली खेळाडू कारकीर्द संपत आल्याचे मान्य केले असले, तरी त्याने निवृत्तीची कोणतीही विशिष्ट तारीख कधीही दिली नव्हती.



आता, वोगला दिलेल्या एका मुलाखतीत त्याने म्हटले आहे की, हे कदाचित फुटबॉलमधील त्याचे शेवटचे वर्ष आहे आणि त्याला एक महान वारसा मागे ठेवायचा आहे. रोनाल्डोने वोगला दिलेल्या एका मुलाखतीत म्हटले की, हे कदाचित माझे फुटबॉलमधील शेवटचे वर्ष असेल आणि मला एक महान वारसा मागे ठेवायचा आहे. तो पुढे म्हणाला की, त्याने आपल्या भविष्याची योजना आखली आहे आणि फुटबॉलमधून निवृत्ती घेतल्यानंतर त्याला व्यस्त ठेवण्यासाठी नेक गोष्टी आहेत.माझं भविष्य पूर्णपणे निश्चित आहे. मला व्यस्त ठेवण्यासाठी माझ्याकडे करायला भरपूर गोष्टी आहेत. निवृत्तीनंतर एक मोठी पोकळी निर्माण होऊ शकते, त्यामुळे तो वेळ अनेक गोष्टीन भरून काढायला हवा, असेही तो म्हणाला.रोनाल्डोने गेल्या नोव्हेंबरमध्ये असेही म्हटले होते की तो आणखी एक-दोन वर्षे खेळू शकतो. त्याने हेही स्पष्ट केले होते की २०२६ चा विश्वचषक त्याचा शेवटचा असेल.

रोनाल्डो या वर्षी निवृत्त होणार असून हा त्याचा शेवटचा वर्ष असेल असे महत्वाचे संकेत त्याने दिले आहेत. रोनाल्डोने आपल्या कारकिर्दीची सुरुवात स्पोर्टिंग सीपीमधून केली. त्यानंतर तो मँचेस्टर युनायटेड, रियल माद्रिद आणि युव्हेंटस यांसारख्या मोठ्या क्लब्सकडून खेळला.

जानेवारी २०२३ पासून तो सौदी अरेबियाच्या अल नासर क्लबसोबत आहे. त्याच्या कारकिर्दीतील सर्वात यशस्वी काळ रियल माद्रिदमध्ये होता, जिथे त्याने ४३८ सामन्यांमध्ये विक्रमी ४५० गोल केले. रोनाल्डोने या वर्षीच्या विश्वचषकात तीन गोल करून पोर्तुगालला १६ संघांच्या फेरीत पोहोचण्यास मदत केली.

# निवडक

## मातृशोकात नितेशने दाखवले धैर्य

**मुंबई :** भारतीय क्रिकेटपटू नितीश राणासाठी गेल्या काही दिवसांपासूनचा काळ खूप भावनिक आणि कठीण आहे. ११ ऑगस्ट रोजी त्यांच्या आईचे निधन झाले, ज्यामुळे संपूर्ण कुटुंब दुःखाने खचले. या दुःखात आणि तीव्र शोकातही, नितीश राणा जराही डगमगला नाही आणि त्याने नुकतीच एक दमदार खेळी केली. आईला गमावल्यानंतर काही तासांतच, त्याने मैदानात परतण्याचा कठीण निर्णय घेतला, ज्यामुळे सर्वांनाच धक्का बसला.गहन दुःखात मैदानात उतरलेल्या नितीश राणाने बॅटने शानदार कामगिरी केली. त्याने मागील सामन्यात आक्रमक अर्धशतक झळकावत उत्कृष्ट फलंदाजी केली. अर्धशतक पूर्ण झाल्यावर नितीश मैदानावर अत्यंत भावूक झाला आणि आकाशाकडे पाहून त्याने ही विशेष खेळी आपल्या आईला समर्पित केली. नितीश राणाने अवघ्या ३३ चेंडूंमध्ये १८१.८२ च्या स्ट्राईक रेटने सहा षटकार आणि चार चौकारांसह ६० धावा केल्या. या खेळीमुळे त्याच्या संघाला दिल्ली प्रीमियर लीगच्या सामन्यात १६९ धावांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. तथापि, त्याचा संघ, न्यू दिल्ली लायन्स, साऊथ दिल्ली सुपरस्टार्सकडून १० गडी राखून पराभूत झाला. प्रत्येकजण नितीश राणाच्या खेळीचे आणि त्याच्या जिद्दीचे कौतुक करत आहे. आपल्या आईला गमावण्याचे दुःख सहन करत असताना संघासाठी इतकी चांगली कामगिरी करणे हे कोणत्याही खेळाडूसाठी सोपे काम नाही.

## ऋषभ पंतचा कसोटीत वर्ल्ड रेकॉर्ड

**नवीदिल्ली :** भारतीय संघाचा स्फोटक फलंदाज ऋषभ पंतने मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. जगातील अनेक बड्या बड्या क्रिकेटपटूंना मागे टाकत विश्वविक्रम रचला आहे. ऋषभ पंतने आपलं अर्धशतकदेखील पूर्ण केलं. नॉटिंगहॅममध्ये इंग्लंडविरुद्ध कसोटी पदार्पण केल्याच्या दिवसापासून बरोबर आठ वर्षांनी ऋषभ पंतने आणखी एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला. श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीच्या चौथ्या दिवशी २८ वर्षीय पंतने दुसऱ्या डावात आपला १००वा कसोटी षटकार लगावला. पहिल्या डावात ३९ धावांची खेळी करताना पंतने एक षटकार मारला होता. दुसऱ्या डावात त्याने लाहिरू कुमारा टाकत असलेल्या डावातील १४व्या चेंडूवर लॉन्ग-ऑफच्या दिशेने गगनचुंबी षटकार ठोकला. हा चेंडू मैदानाबाहेर गेल्याने अंपायरना चेंडू बदलावा लागला. यानंतर कुमाराच्याच गोलंदाजीवर पंतने फाइन लेगच्या दिशेने हुक करत षटकार ठोकला आणि अवघ्या ५३ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण केलं. हा त्याचा कसोटी क्रिकेटमधील १००वा षटकार ठरला.

## यंदा कुणालाच खेलरत्न नाही

**नवी दिल्ली :** क्रीडा मंत्रालयाने मंगळवारी २०२५ च्या राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांची घोषणा केली. २०२५ मधील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १७ खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे आणि यंदा कोणत्याही खेळाडूला मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार देण्यात आलेला नाही. तसेच जाहीर करण्यात आलेल्या १७ अर्जुन पुरस्कार विजेत्यांच्या यादीत एकाही क्रिकेटपटूचा समावेश करण्यात आलेला नाही. तेजस्विन शंकर, मुहम्मद अजमल व प्रियंका गोस्वामी (अॅथलेटिक्स), त्रिशा जॉली व पुलेला गायत्री गोपीचंद (बॅडमिंटन), नरेंद्र (बॉक्सिंग), विदित गुजराती व दिव्या देशमुख (बुद्धिबळ), धनुश श्रीकांत (डिफ शूटींग), लालरेम्सियामी व राजकुमार पाल (हॉकी), सुरजीत व पूजा (कबड्डी), ऋद्रांश खंडेलवाल (पॅरा शूटिंग), एकता भायन(पॅरा अॅथलेटिक्स), अरविंद सिंह (नौकानयन), अखिल शेओरन (नेमबाज) यांना अर्जुन पुरस्कार जाहीर झला आहे.पुरस्कारांसाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते आणि ऑनलाइन पोर्टलद्वारे स्वतः अर्ज करण्याची परवानगी देण्यात आली होती. यावर्षी या पुरस्कारांसाठी मोठ्या संख्येने अर्ज प्राप्त झाले होते, ज्यांचा विचार न्यायमूर्ती (निवृत्त) मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने केला.

# ऑस्ट्रेलियावर ओढवणार नामुष्की

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बांगलादेशविरुद्ध मायदेशात झालेल्या मानहानीकारक पराभवानंतर ऑस्ट्रेलियाला आणखी एका धक्क्याला सामोरे जावे लागू शकते. बांगलादेशने ऑस्ट्रेलियाला मायदेशात पहिल्यांदाच पराभूत केले आहे. बांगलादेशविरुद्धच्या पराभवाव्यतिरिक्त, ऑस्ट्रेलियाने आयसीसीच्या ओव्हर-रेट नियमांचे उल्लंघन केल्याचेही आढळून आले आहे. तथापि, ऑस्ट्रेलियन संघावर कारवाई करायची की नाही, हे आयसीसीने अद्याप ठरवलेले नाही.







हे लक्षात घेण्यासारखे आहे की, पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखालील यजमान संघाने खेळाच्या तिसऱ्या दिवशी नियोजित ९० षटकांपेक्षा चार षटके कमी, केवळ ८६ षटके टाकली. बांगलादेशने चौथ्या दिवसाच्या दुसऱ्या सत्रात केवळ ५७ धावांचे लक्ष्य गाठले, परंतु असे असूनही ऑस्ट्रेलियाला त्याचे परिणाम भोगावे लागू शकतात.

आयसीसीच्या नियमांनुसार, कसोटी सामन्याच्या एका दिवसात ९० षटके टाकणे आवश्यक असते. पाऊस किंवा अपुरा प्रकाश यांसारख्या व्यत्ययांसाठी अतिरिक्त वेळ दिला जातो. तथापि, बांगलादेशविरुद्धच्या ढाका, डार्विन कसोटीत कोणताही व्यत्यय आला नाही आणि ऑस्ट्रेलियन संघ आपल्या कोट्यातील पूर्ण षटके टाकू शकला नाही.

अशा परिस्थितीत, सामनाधिकाऱ्याच्या मूल्यांकनाच्या आधारावर, आयसीसी धीम्या षटकगतीसाठी जागतिक कसोटी चॅम्पियनशिपचे गुण देखील कमी करू शकते. ऑस्ट्रेलिया सध्या ८४ गुणांसह आणि ७७.७८ च्या धावगती टक्केवारीसह डब्ल्यूटीसी गुणतालिकेत आघाडीवर आहे. त्यामुळे, त्यांना किमान चार गुणांचा दंड होऊ शकतो. २०२० मध्ये, धीम्या षटकगतीमुळे ऑस्ट्रेलियाचे डब्ल्यूटीसी गुण कमी करण्यात आले होते, ज्यामुळे त्यांना अंतिम फेरीत पोहोचता आले नाही.

### खेळाडूंना दंड होऊ शकतो

अहवालानुसार, बांगलादेशविरुद्ध ऑस्ट्रेलियाच्या प्लेइंग इलेव्हनमधील सर्व खेळाडूंना दंड होऊ शकतो. ऑस्ट्रेलियन खेळाडूंना प्रत्येक कसोटी सामन्यासाठी २०,००० डॉलर्स मानधन मिळते. शिवाय, तिसऱ्या दिवशी एकूण चार षटके कमी टाकण्यात आली. परिणामी, प्रत्येक खेळाडूला ४,००० डॉलर्सचा दंड होऊ शकतो. यामुळे एकूण ४४,००० डॉलर्सचा दंड होईल, जो अंदाजे ३० लाख रुपये आहे. ऑस्ट्रेलिया हा संघ गेले कित्येक वर्ष क्रिकेटमध्ये वाघासारखा खेळतोय. मात्र बांग्लादेशला कमी लेखणाऱ्या या संघाला अगदीच मानहानिकारक पराभव यावेळ स्वीकारावा लागला आहे. यामुळे आता पुढे दुसऱ्या कसोटीत नक्की काय घडणार याचीच सर्वांना उत्सुकता लागून राहिली आहे.

## वर्ल्ड कपमध्ये रंगणार

# भारत-पाकिस्तानचा महामुकाबला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

हॉकी विश्वचषक २०२६ च्या स्पर्धेत इंग्लंडकडून २-४ ने झालेल्या पराभवामुळे भारताच्या पुढील फेरीत पोहोचण्याच्या आशांना धक्का बसला आहे. इंग्लंडकडून २-४ ने पराभव झाल्यानंतर आता भारतासमोर पाकिस्तानचे आव्हान आहे. हे कट्टर प्रतिस्पर्धी पुन्हा एकदा आमनेसामने येणार आहेत. हा विजय त्यांना थेट पुढच्या टप्प्यात घेऊन जाईल, तर पराभव झाल्यास भारतीय संघ विजेतेपदाच्या शर्यतीतून बाहेर पडेल.




भारत आणि पाकिस्तान यांच्यातील पूल डी चा सामना बुधवार, १९ ऑगस्ट रोजी खेळला जाईल. हा हाय-व्होल्टेज सामना नेदरलँड्समधील अॅमस्टेलवीन येथील वेगेनर हॉकी स्टेडियमवर आयोजित केला जाईल. सामना स्थानिक वेळेनुसार दुपारी ३:०० वाजता सुरू होईल, तर भारतातील सामना स्थानिक वेळेनुसार सायंकाळी ६:३० वाजता सुरू होईल.

या स्पर्धेत भारताने आतापर्यंत एक सामना जिंकला असून एक गमावला आहे. संघाकडे तीन गुण असून तो पूल डी मध्ये दुसऱ्या स्थानावर आहे. इंग्लंड सहा गुणांसह पुढील टप्प्यासाठी आधीच पात्र ठरला आहे.

पाकिस्तान आणि वेल्सकडे प्रत्येकी एक गुण आहे. जर भारताने पाकिस्तानला हरवले, तर त्याचे सहा गुण होतील आणि तो कोणत्याही अडचणीशिवाय पुढील टप्प्यात प्रवेश करेल.

जर सामना अनिर्णित राहिला, तर भारताला चार गुण मिळतील. अशा परिस्थितीत, वेल्स आणि इंग्लंड यांच्यातील सामन्याचा निकाल निर्णायक ठरेल. जर इंग्लंड जिंकला किंवा सामना अनिर्णित राहिला, तर भारताचे स्थान निश्चित होईल. मात्र, जर वेल्स जिंकला, तर गोल फरक आणि इतर टाय-ब्रेकर नियमांनुसार निर्णय घेतला जाऊ शकतो. जर भारत पाकिस्तानकडून हरला, तर पाकिस्तानला चार गुण मिळतील, तर भारताकडे फक्त तीन गुण शिल्लक राहतील. अशा परिस्थितीत, भारतासाठी पुढच्या टप्प्यात पोहोचणे अत्यंत कठीण होईल.

# खारघर हिल मॅरेथॉन 'सिम्बॉल'चे अनावरण

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने क्रीडा, संस्कृती आणि आरोग्याला चालना देण्यासाठी 'खारघर हिल मॅरेथॉन २०२६'चे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेत देशातील पहिली ४२ किलोमीटर अंतराची 'हिल मॅरेथॉन' होणार असल्याचा दावा करण्यात आला असून, पनवेल, नवी मुंबईसह देशभरातील धावपटू आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर नितीन पाटील आणि पालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.



खारघरच्या निसर्गरम्य डोंगररांगा, हिरवाई आणि स्वच्छ हवेच्या सान्निध्यात धावण्याचा आगळावेगळा अनुभव या मॅरेथॉनच्या माध्यमातून धावपटूंना मिळणार आहे. स्पर्धेत ४२ किमी फुल मॅरेथॉन, २१ किमी हाफ मॅरेथॉन, १० किमी रन, ५ किमी रन आणि ३ किमी फन रन अशा विविध प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे.

आरोग्य, फिटनेस, पर्यावरण संवर्धन आणि क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम असल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. या मॅरेथॉनमध्ये तब्बल १० हजारांहून अधिक धावपटू सहभागी होण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## पुरुष हॉकी वर्ल्ड कप स्पर्धा २०२६

# भारताचा इंग्लंडकडून दारुण पराभव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नेदरलँड्समध्ये सध्या पुरुष हॉकी वर्ल्ड कप २०२६ स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत एमस्टेलवीन येथे भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यात महत्वाचा सामना खेळवला गेला. पूल डी अंतर्गत हा सामना पार पडला. या सामन्यात भारतीय हॉकी संघाला इंग्लंडविरुद्ध २-४ असा पराभव स्वीकारावा लागला.

मध्यांतरापर्यंत २-१ अशी आघाडी घेतल्यानंतरही भारतीय संघाला उत्तरार्धात ही पकड कायम ठेवता आली नाही.मध्यांतरापर्यंत २-१ अशी आघाडी घेतल्यानंतरही भारतीय संघाला उत्तरार्धात ही पकड कायम ठेवता आली नाही. या पराभवामुळे हॉकी वर्ल्ड कपच्या इतिहासात इंग्लंडविरुद्ध विजय मिळवण्याची भारताची ३२ वर्षांची प्रतीक्षा कायम राहिली आहे. पहिल्या क्वार्टरमध्ये निक बांडुरकने गोल करत इंग्लंडला १-० अशी सुरुवातीची आघाडी मिळवून दिली.

दुसऱ्या डावात कर्णधार हरमनप्रीत सिंगने कॉर्नरवर गोल करत इंग्लंडची बरोबरी केली. त्यानंतर दिलप्रीत सिंगने मैदानी गोल करत भारताला २-१ आघाडी मिळवून दिली. त्यानंतर पुन्हा इंग्लंडचा संघ ३-२ असा आघाडीवर गेला. त्यानंतर भारताला आघाडी मिळवणे कठीण गेले.भारतीय संघाला १९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या पाकिस्तानविरुद्धच्या शेवटच्या पूल सामन्यात विजय मिळवणे अत्यंत आवश्यक आहे.

## अनस्टॉपेबल एलबीएचएम ब्लिट्झ व रॅपिड खुल्या बुद्धिबळ स्पर्धा

# चौथ्या फेरीअखेर धुरळा!

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

आर्यन्स बुद्धिबळ अकादमीच्या वतीने महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे उपाध्यक्ष राजेंद्र कोंडे आणि केतन खैरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अनस्टॉपेबल एलबीएचएम ब्लिट्झ व रॅपिड खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत चौथ्या फेरीनंतर विविध वयोगटांतील विहान कांबळे, अद्विक नवल, अर्णव पाटील, रिजूल कुऱ्हाडे आणि विहान देशमुख यांनी प्रत्येकी ४ गुणांची कमाई केली.



नवले लॉन्स, पुणे येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत चौथ्या फेरीअखेर विविध वयोगटांतील आघाडीच्या खेळाडूंनी आपले विजयी अभियान कायम ठेवले. ८ वर्षांखालील गटात विहान कांबळे याने शर्विल गोडबोलेचा पराभव करत चौथा विजय नोंदवला आणि ४ गुणांसह आघाडी मिळवली.

१० वर्षांखालील गटात अद्विक नवल याने जयदेव राणा याचा पराभव करून ४ गुणांची कमाई केली. त्याच गटात अर्णव पाटील याने अगस्त्य शिवरकरवर विजय मिळवत आपली विजयी घोडदौड कायम राखली.

### विहान, अद्विक, अर्णवचा दणदणीत विजय

चौथ्या फेरीअखेर अद्विक आणि अर्णव या दोघांनीही प्रत्येकी ४ गुण मिळवत आघाडीच्या खेळाडूंमध्ये स्थान मिळवले आहे.

१२ वर्षांखालील गटात रिजूल कुऱ्हाडे याने तनिष शिंदेचा पराभव करून ४ गुणांची कमाई केली. सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर रिजूलने चौथ्या फेरीनंतर गटात आघाडीचे स्थान कायम राखले आहे. १५ वर्षांखालील गटात विहान देशमुख याने अर्णव तनपुरेवर विजय मिळवत स्पर्धेतील आपला चौथा विजय नोंदवला. या विजयासह विहान देशमुख यानेही ४ गुणांची कमाई करत आघाडीच्या खेळाडूंच्या यादीत स्थान मिळवले.

# पुण्यनगरीत हॉकीचा रंगला थरार

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

१६व्या हॉकी इंडिया कनिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा २०२६ मध्ये विभाग अ च्या पहिल्या दिवशी हॉकी झारखंड आणि हॉकी हरियाणा यांनी आपापल्या गटात दमदार विजय नोंदवत आघाडी घेतली. गट अ मध्ये हॉकी झारखंडने हॉकी चंदीगडचा ६-० असा एकतर्फी पराभव केला, तर गट ड़बफ्मध्ये हॉकी हरियाणाने हॉकी बंगालवर १०-१ असा दणदणीत विजय मिळवला.

### ■ झारखंड, हरियाणा यांची दमदार सुरुवात

दरम्यान, गट कमध्ये उत्तर प्रदेश हॉकी आणि मणिपूर हॉकी यांच्यातील सामना १-१ असा बरोबरीत सुटल्याने दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुणावर समाधान मानावे लागले. ही स्पर्धा नेहरूनगर, पिंपरी येथील मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम वर सुरू असून, हॉकी महाराष्ट्राच्या यजमानपदाखाली आणि हॉकी इंडियाच्या मार्गदर्शनाखाली तिचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेतील सामने विभाग अ आणि विभाग ब अशा दोन विभागांमध्ये खेळवले जात आहेत.

विभाग अ मधील गट अ च्या सामन्यात हॉकी झारखंडने सुरुवातीपासूनच वर्चस्व राखत हॉकी चंदीगडचा ६-० असा पराभव केला. झारखंडकडून पुष्पा डांग हिने २०व्या आणि ४४व्या मिनिटाला दोन गोल करत संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले. याशिवाय होरो एस्तेरने ३९व्या, मुंदरी सरोजने ४०व्या, जमुना कुमारीने ५१व्या आणि संगीता कुमारीने ५४व्या मिनिटाला प्रत्येकी एक गोल नोंदवला.

# गिल दुसऱ्या डावातही फेल!

**नवी दिल्ली :** भारतीय संघाचा कर्णधार शुबमन गिलने पहिल्या डावात २८ चेंडूंचा सामना केला आणि १६ धावा करून बाद झाला. तर दुसऱ्या डावात २० चेंडूत ८ धावांवर तंबूत परतला. दोन्ही डावात फेल गेल्याने क्रीडाप्रेमींचा भ्रमनिरास झाला आहे. गिलने निवडलेला फटका पाहून रहाणे आणि पुजाराही हैराण झाले आहेत. पुजाराने तर गिलची अक्कलच काढली. जो फटका मारता येत नाही तो मारायचा तरी का? असा प्रश्नच पुजाराने उपस्थित केला.


शुबमन गिल स्विप शॉट मारण्यात तितका पटाईत नाही. हे वारंवार दिसून आलं आहे. पण त्याने हा प्रयोग पुन्हा एकदा करून पाहिला आणि फेल झाला. प्रभात जयसूर्याच्या सरळ चेंडूवर त्याने स्विप मारण्याचा प्रयत्न केला. पण पूर्णपणे फसला आणि पायावर आदळला. त्यामुळे पायचीत होत तंबूत परतला.

## जागतिक बॅडमिंटन स्पर्धा | आयुषचा जगज्जेत्याला धक्का!

# भारताचे पाच दणदणीत विजय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा २१ वर्षीय उगवता तारा आयुष शेट्टीने सोमवारी जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. चीनचा विद्यमान जगज्जेता तसेच अग्रमानांकित शी यूकी याच्यावर आयुषने धक्कादायक विजय मिळवून राऊंड ऑफ ३२ फेरीत प्रवेश केला. यासह भारताच्या अन्य स्पर्धकांनीदेखील आपापले सामने जिंकून दुसरी फेरी गाठली. त्यामुळे स्पर्धेचा पहिला दिवस भारतासाठी पंचतारांकित विजयाचा ठरला.



सोमवारी पुरुष एकेरीत कोर्ट क्रमांक १ वर होणाऱ्या आयुष विरुद्ध यूकी यांच्यातील लढतीकडे सर्वांचे लक्ष लागून होते. ३० वर्षीय यूकी हा २०२५च्या जागतिक स्पर्धेचा विजेता तर होताच. शिवाय २०२२च्या राष्ट्रकुलमध्येही त्याने सुवर्ण पटकावले होते. जागतिक क्रमवारीत तो सध्या अग्रस्थानी विराजमान आहे. मात्र भारताच्या बिगरमानांकित आयुषने अविश्वसनीय खेळ करताना यूकीला २१-१४, १३-२१, २१-१९ असे पराभूत केले. १ तास आणि १३ मिनिटांच्या संघर्षानंतर आयुषने बाजी मारली.

कर्नाटकच्या आयुषने पहिल्या गेममध्ये आक्रमक खेळ करत ११-५ अशी आघाडी घेत अखेरीस २१-१४ असा गेम आपल्या नावावर केला. दुसऱ्या गेममध्ये यूकीने २१-१३ अशी बाजी मारून पुनरागमन करत सामना निर्णायक तिसऱ्या गेममध्ये नेला. तिसऱ्या गेममध्ये आयुषने १५-५ अशी मोठी आघाडी घेतली होती. मात्र, चिनी खेळाडूने सलग गुण मिळवत आघाडी २०-१९ अशी कमी केली. या दबावाच्या प्रसंगी शांत राहून आयुषने शेवटचा गुण मिळवत कारकिर्दीतील सर्वात मोठ्या विजयावर शिक्कामोर्तब केले. आयुषचा पुढील फेरीतील प्रतिस्पर्धी अद्याप ठरलेला नाही. विजयानंतर आयुषने चाहत्यांचे अभिवादन केले. तसेच त्यांच्यासह सेल्फी काढून तो कोर्टमधून बाहेर पडला.

### दुहेरीत भारताची हॅटट्रिक

महिला दुहेरीत दोन, तर पुरुष दुहेरीत एक असे दुहेरीच्या प्रकारांत भारताने एकूण तीन विजय मिळवले. महिला दुहेरीत सर्वप्रथम ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीने स्पेनच्या पॉला लोपेझ आणि लुसिया रॉड्रिग्ज यांचा २१-९, २१-१३ असा पराभव केला. पुरुष दुहेरीत हरीहरन अमसाकरुणन आणि एम. आर. अर्जुन यांच्याविरुद्धच्या सामन्यात आयर्लंडच्या प्रतिस्पर्धी खेळाडूंनी दुखापतीमुळे माघार घेतल्याने भारतीय जोडीने दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. कविताप्रिया सेल्वाम आणि सिमरन सिंगी यांनी स्पेनच्या निकोल कॅरुला आणि कार्मेन मारिया जिमेनेझ यांचा २२-२०, २१-१४ असा पराभव केला. सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या पाचव्या मानांकित जोडीला पहिल्या फेरीत बाय मिळाला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)